POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०२ ● मुंबई, गुरुवार, ०४ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

राज्यात विजांचा कडकडाट अन् वादळी वारे...

18 जिल्ह्यांवर संकट घोंगावणार

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



राज्यात मान्सूनपूर्व पावसाची सक्रियतेत वाढ होत असून विविध भागांत हवामान विभागाचा वेगवेगळा इशारा जारी करण्यात आला आहे. 3 जून 2026 रोजी हवामान विभागाने कोकणातील 4 जिल्ह्यांसाठी उष्णतेचा यलो अलर्ट जारी केला आहे, अशातच जाणून घेऊयात एकूण हवामान विभागाचा अंदाज पुढीलप्रमाणे...

कोकण : कोकण विभागातील पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांसाठी उष्णतेचा अलर्ट वर्तवण्यात आला. या भागांत उष्ण आणि दमट हवामान राहण्याची अधिक शक्यता असून नागरिकांनी दुपारी उन्हात बाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी. याच विभागातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट वर्तवण्यात आला.

उत्तर महाराष्ट्र : उत्तर महाराष्ट्रातील नाशिक आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट वर्तवण्यात आला. तर धुळे, नंदुरबार आणि जळगाव या जिल्ह्यांना कोणताही अलर्ट नसला तरीही काही भागांत हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला.

पश्चिम महाराष्ट्र : पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर आणि सातारा या तीन जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्टचा अंदाज आहे. तर सांगली आणि सोलापूर या दोन जिल्ह्यांना कोणताही अलर्ट वर्तवण्यात आलेला नाही.

मराठवाडा : मराठवाडा विभागातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्टचा अंदाज वर्तवला आहे. तर दुसरीकडे जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांना कोणताही अधिकृत अलर्ट वर्तवला नसला तरीही काही भागांत ढगाळ वातावरणासह हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.

विदर्भ : विदर्भातील भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, गोंदिया, वर्धा आणि यवतमाळ या सात जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट वर्तवला आहे. याच भागांत मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.

4 जणांकडून 10 महिने बलात्कार, बॉयफ्रेंडच काढायचा व्हिडिओ अन्...

■कोल्हापूर। प्रतिनिधी,

राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटना सातत्याने समोर येत असताना कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. प्रेमाच्या नावाखाली एका 19 वर्षीय महाविद्यालयीन तरुणीला जाळ्यात ओढून तिचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ तयार करण्यात आले. त्यानंतर ते व्हायरल करण्याची धमकी देत तब्बल दहा महिने तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.


आदित्य शेटके विक्रम पाटील प्रणवगिरी पालकर रणजित मुधोळकर

सततच्या मानसिक त्रासाला आणि अत्याचारांना कंटाळून अखेर पीडित तरुणीने पोलिसांकडे धाव घेतली. तिच्या तक्रारीनंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने कारवाई करत चारही आरोपींना अटक केली. हे सर्व आरोपी राधानगरी परिसरातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

ओळखीपासून प्रेमसंबंधांपर्यंत

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य आरोपी आदित्य शेटके हा राधानगरी परिसरात फोटोग्राफीचा व्यवसाय करतो. ओळखपत्र तयार करून देण्याच्या निमित्ताने त्याची 19 वर्षीय महाविद्यालयीन तरुणीशी ओळख झाली. कालांतराने या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधांमध्ये झाले. मात्र, या प्रेमसंबंधांच्या आड आरोपीचा वेगळाच हेतू असल्याचा आरोप आहे. ओळखपत्र देण्याच्या बहाण्याने त्याने तरुणीला एका ठिकाणी बोलावून घेतले. त्यानंतर तिला मुरगुड परिसरातील तलावाजवळील झाडीमध्ये नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. याच वेळी त्याने तिचे काही आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ मोबाइल व कॅमेऱ्यात शूट केल्याचे समोर आले आहे.

व्हिडिओ आणि ब्लॅकमेलिंग

फोटो आणि व्हिडिओ तयार केल्यानंतर आरोपीने आपले खरे रूप दाखवण्यास सुरुवात केली. हे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत त्याने तरुणीला ब्लॅकमेल करणे सुरू केले. याच दबावाचा फायदा घेत आरोपीने केवळ स्वतःच तिचे शोषण केले नाही, तर तिला आपल्या इतर मित्रांच्या संपर्कात आणून त्यांच्यासोबतही संबंध ठेवण्यासाठी भाग पाडल्याचा गंभीर आरोप आहे.

4 आरोपींकडून तरुणीवर बलात्कार

तक्रारीनुसार, आदित्य शेटकेने तरुणीची ओळख रणजीत संभाजी मुधोळकर याच्याशी करून दिली. त्यानेही फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत कोल्हापूर शहर आणि परिसरातील विविध लॉजमध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. यानंतर रणजीतने तरुणीची ओळख पवनगिरी चंद्रशेखर पालकर याच्याशी करून दिली. त्यानेदेखील ब्लॅकमेल करत तरुणीवर अत्याचार केला. पुढे विक्रम रामचंद्र पाटील यालाही या प्रकरणात सहभागी करण्यात आले. 'तुझे सर्व फोटो आणि व्हिडिओ डिलीट करून हे प्रकरण कायमचे मिटवतो', असे आश्वासन देत त्यानेही तरुणीला लॉजमध्ये नेऊन अत्याचार केल्याचा आरोप आहे.

दहा महिने मानसिक आणि शारीरिक छळ

पीडितेच्या तक्रारीनुसार, गेल्या दहा महिन्यांपासून हे चारही आरोपी वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार करत होते. व्हिडिओ व्हायरल करण्याची भीती दाखवून तिचे सतत शारीरिक आणि मानसिक शोषण करण्यात आले. याशिवाय, प्रकरण मिटवण्यासाठी आरोपींकडून पैशांची मागणीही करण्यात आली. भीतीपोटी पीडितेने काही आरोपींना पैसे दिल्याचेही समोर आले आहे. मात्र, त्यानंतरही तिचा छळ थांबला नाही. तसेच, एका आरोपीने तरुणीला लग्न करण्यासाठीही दबाव टाकला. माज्याशी लग्न केल्यासच फोटो आणि व्हिडिओ डिलीट करेन, अशी धमकी देत तिचा छळ सुरूच ठेवण्यात आल्याचा आरोप आहे.

न्यायालयाने सुनावली पोलीस कोठडी

अटक करण्यात आलेल्या चारही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून आरोपींकडून आणखी काही धक्कादायक माहिती समोर येते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

डिजिटल ब्लॅकमेलिंगचा गंभीर धोका

ही घटना डिजिटल युगातील सायबर ब्लॅकमेलिंग आणि खाजगी माहितीच्या गैरवापराच्या वाढत्या धोक्याचे गंभीर उदाहरण मानली जात आहे. प्रेम आणि विश्वासाचा गैरफायदा घेत एखाद्याचे खाजगी फोटो किंवा व्हिडिओ तयार करणे, ते व्हायरल करण्याची धमकी देणे आणि त्याद्वारे आर्थिक अथवा लैंगिक शोषण करणे हा गंभीर गुन्हा आहे. कोल्हापुरातील या घटनेमुळे पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून अशा घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाईची मागणी होत आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या तपासातून आणखी काही महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मशिद पाडल्याचा बदला...

भिवंडी दहशतवाद्यांच्या रडारवर, थेट पाकिस्तानात हँडलर्सपर्यंत पोहोचले व्हिडिओ

काही दिवसांपूर्वी वांद्रे गरीबनगर येथे रेल्वेच्या अतिक्रमण केलेल्या जागेवरील अनधिकृत बांधकाम पाडण्यात आलं. यात अनधिकृत मशीदही होती. या मशिदीच्या पाडकामाचा बदला घेण्यासाठी काररस्थानं रचली जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



■भिवंडी। प्रतिनिधी,

अलीकडेच दिल्ली पोलिसांनी कारवाई केली. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा कट उधळून लावला. पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा क्रक शहजाद भट्टी गँगच्या मदतीने भारतात दहशतवादी कारवाया करण्याच्या प्रयत्नात होती. मात्र, त्याआधीच दिल्ली पोलिसांनी त्यांचा डाव उधळून लावला. आता उत्तर प्रदेश दहशतवाद विरोधी पथकाने दानियाल अशरफ आणि कृष्णा मिश्रा या दोघांना अटक केली. त्यांच्या चौकशीतून मुंबई जवळच्या भिवंडी संदर्भातील धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यांनी भिवंडीतील नरपोली पोलीस ठाण्याची रेकी केल्याचं समोर आलं आहे. तपासात दहशतवादी कटाचा धक्कादायक खुलासा झाला आहे.

वांद्रे गरीबनगर येथील अनधिकृत मशिदीच्या पाडकामाचा बदला घेण्यासाठी पोलिसांवर हल्ल्याचा कट रचल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तपासात भिवंडीतील नरपोली पोलीस ठाण्याची रेकी करण्यात आल्याचे उघड झाले आहे. उत्तर प्रदेश एटीएसने अटक केलेल्या दानियाल अशरफ आणि कृष्णा मिश्रा या आरोपींपैकी अशरफने नरपोली पोलीस ठाण्याचे फोटो आणि परिसरातील पुलाचा 18 सेकंदांचा व्हिडिओ तयार करून पाकिस्तानस्थित हँडलर्सना पाठवल्याचा आरोप आहे.

'तहरीक-ए-तालिबान हिंदुस्तान'शी संबंध

तपास यंत्रणांच्या मते, आरोपींना पोलिस ठाणी व सुरक्षा व्यवस्थेबाबत माहिती गोळा करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

या नेटवर्कचे संबंध कथितरित्या शहजाद भट्टी आणि 'तहरीक-ए-तालिबान हिंदुस्तान'शी असल्याचा संशय असून, आयएसआयच्या भूमिकेचाही तपास सुरू आहे. सोशल मीडियाद्वारे तरुणांना पैशांचे आमिष दाखवून संवेदनशील ठिकाणांची रेकी करण्यासाठी वापरले जात असल्याची माहितीही तपासात समोर आली आहे. सदर प्रकरणात सखोल चौकशी तपास यंत्रणे मार्फत सुरु आहे.

शहजाद सोबत या कटात क्रकएजंट्स सुद्धा

दानियाल अशरफ आणि कृष्णा मिश्रा यांचं दिल्ली मॉड्यूलशी कनेक्शन समोर आलं आहे. या वर्षी एप्रिल-मे महिन्यात यूपी एटीएसने 8 संशयित दहशतवाद्यांना देशविरोधी कारवायांप्रकरणी अटक केली आहे. दिल्ली स्पेशल सेलने पकडलेले सर्व संशयित सोशल मीडियाद्वारे कृष्णा आणि अशरफच्या संपर्कात होते. दोन्ही मॉड्यूल पाकिस्तान स्थित गँगस्टर शहजाद भट्टी हँडल करत होता. शहजाद सोबत या कटात क्रक एजंट्स सुद्धा आहेत.

काही दिवसांपूर्वी कुशीनगरमधून कृष्णा मिश्रा आणि बाराबंकी येथूनि दानियाल अशरफला देशविरोधी कारवायांप्रकरणी अटक केली. दोघांची कसून चौकशी केली. त्यावेळी त्यांच्या मोबाईलमधून मिळालेल्या पुराव्यांमध्ये मोठा खुलासा झाला.

तुकाराम मुंढेंची धडक कारवाई सुरुच

सात दिवसात 102 व्यक्तींना अटक अन् 1 कोटींचा साठा जप्त

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील प्रतिबंधित पान मसाला, गुटखा, भेसळ अन्नपदार्थाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर सात दिवस धडक मोहीम राबवत 25 मे ते 31 मे 2026 या कालावधीत एकूण 1 कोटी 58 लाख 28 हजार 677 रुपयांचा साठा जप्त केला असून 102 व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. एकूण 203 आस्थापनांवर कारवाई केली. तसेच 86 आस्थापना सील करण्यात आल्या आहेत.

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निदेर्शानुसार राज्यभर प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक व विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत अधिक संशयास्पद अन्न व औषध उत्पादक आणि विक्रेत्यांच्या ठिकाणांवर थेट छापे टाकण्यात आले. यात कोकण विभाग (47 कारवाया आणि 46 व्यक्तींना अटक), बृहन्मुंबई (22 कारवाया आणि 23 व्यक्तींना अटक), पुणे विभाग (14 कारवाया आणि 13 व्यक्तींना अटक), नाशिक विभाग (5 कारवाया आणि 5 व्यक्तींना अटक), छत्रपती संभाजीनगर विभाग (8 कारवाया आणि 8 व्यक्तींना अटक), अमरावती विभाग (5 कारवाया आणि 5 व्यक्तींना अटक) आणि नागपूर विभाग (2 कारवाया आणि 2 व्यक्तींना अटक) अशा सात आस्थापनांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम 123, 223, 274, 275 तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम 26, 27, 30(2)(अ) आणि 59 अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत



34 लाख 5 हजार 48 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

भेसळयुक्त व निकृष्ट अन्नपदार्थांवरही कारवाई

अन्न व औषध प्रशासनाच्या 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' या संकल्पनेअंतर्गत राज्यभर भेसळ, अस्वच्छ अन्न उत्पादक आणि नियमभंग करणाऱ्या अन्न व्यवसायिकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, भंडारा, जालना, बीड, नांदेड, परभणी, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, जळगाव, रायगड, धुळे आदी जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर तपासण्या केल्या.

या मोहिमेत 73 आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, गूळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईस्क्रीम, कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाले, शेंगदाणा चिक्की तसेच भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांचा समावेश होता. या कारवाईत 1 कोटी 24 लाख 23 हजार 629 रुपये किमतीचा आणि सुमारे 90,639 किलो वजनाचा संशयित निकृष्ट व असुरक्षित अन्नसाठा जप्त करण्यात आला. संबंधित अन्न नमुने पुढील विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

तक्रारीं देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. भेसळ, निकृष्ट दजार्चे अन्न किंवा प्रतिबंधित पदार्थांचे उत्पादन व विक्री आढळल्यास यापुढे आणखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. अन्नपदार्थांच्या दजार्बाबत शंका असल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा. यासाठी स्वतंत्र तक्रार नोंदणी ॲप विकसित करण्यात आले आहे. तसेट टोल फ्री क्रमांक 1800222365 आणि ई-मेल : jc-foodhq@gov.in यावर तक्रार करताना नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, संबंधित आस्थापनेचा अचूक पत्ता आणि कोणत्या अन्नपदार्थात भेसळ होत असल्याची माहिती नमूद करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

फरार दहशतवादी आरोपी हुजैफा मिरा-भाईंदरमधून अटकेत



■भाईंदर। प्रतिनिधी,

महाराष्ट्र एटीएस आणि दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने संयुक्त कारवाई करत मिरा-भाईंदर परिसरातून फरार दहशतवादी आरोपी हुजैफा याला अटक केली आहे. देशातील विविध राज्यांमध्ये करण्यात आलेल्या अटक आणि चौकशीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, हुजैफा हा कथितरित्या सैयद मुदस्सिर हुसेन उर्फ मुन्ना झिंगाडा याच्या संपर्कात होता. मुन्ना झिंगाडाचा संबंध दाऊद इब्राहिम टोळीशी असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, तो या मॉड्यूलच्या कारवायांना मार्गदर्शन करत असल्याचा आरोप आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मुंबईतील वांद्रे परिसरातील रेल्वे जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईनंतर निर्माण झालेल्या तणावाचा फायदा घेत तरुणांना भडकवून बेकायदेशीर व दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी करण्याचा कट रचला जात होता. या कटाचे संचालन पाकिस्तानातील कराची येथून होत असल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे. हुजैफावर मुंबईत स्थानिक नेटवर्क उभारणे आणि कारवायांसाठी आर्थिक व्यवस्था करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. तपासादरम्यान त्याला या नेटवर्ककडून सुमारे एक लाख रुपये मिळाल्याचे समोर आले आहे. तसेच काही तरुणांना सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्क करून कामाच्या बदल्यात पैसे देण्याचे आमिष दाखवण्यात येत असल्याची माहितीही उघड झाली आहे. या प्रकरणात यापूर्वी अटक करण्यात आलेले तौकीर आणि साजिद शेख यांना अनुक्रमे कुर्ला आणि मुंब्रा येथून ताब्यात घेण्यात आले होते. दोघेही अमली पदार्थांच्या व्यसनाधीन असून सहज पैसा मिळविण्याच्या लालसेपोटी या नेटवर्कच्या संपर्कात आल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, अंडरवर्ल्ड गँगस्टर मुन्ना झिंगाडाचा निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या हुजैफाला बुधवारी ठाणे न्यायालयात हजर करण्यात आले. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने त्याच्या ट्रान्झिट रिमांडची मागणी केली असून पुढील चौकशीसाठी त्याला दिल्लीला नेण्याची तयारी सुरू आहे. सध्या तपास यंत्रणा संपूर्ण नेटवर्क, त्याचे आर्थिक स्रोत आणि कथित दहशतवादी कारवायांशी असलेले संबंध यांचा सखोल तपास करत आहेत.

बनावट सीआयडी अधिकाऱ्यांची थेट पोलीस आयुक्त कार्यालयात धडक... पुढे झालं ते ऐकून डोक्याला हात लावाल!

■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

छत्रपती संभाजीनगरमध्ये धक्कादायक आणि तितकीच आश्चर्यकारक घटना उघडकीस आली आहे. स्वतःला उक्ळ अधिकारी असल्याचे भासवत 2 जण थेट पोलीस आयुक्त कार्यालयात पोहोचले. गळ्यात बनावट ओळखपत्र, अधिकाऱ्यांसारखा रुबाब आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी पोलीस यंत्रणेलाच गंडा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या सखोल चौकशीत त्यांचा बनाव उघड झाला आणि दोघांनाही तात्काळ अटक करण्यात आली. या घटनेमुळे सुरक्षा व्यवस्थेवर आणि सरकारी कार्यालयांमध्ये होणाऱ्या बनावट ओळख वापराच्या प्रकारांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन व्यक्ती गळ्यात उक्ळ विभागाचे ओळखपत्र लावून छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्त कार्यालयात दाखल झाले. त्यांनी स्वतःची ओळख गुन्हे अन्वेषण विभागातील अधिकारी अशी करून दिली. त्यांच्या बोलण्याच्या शैलीमुळे आणि आत्मविश्वासामुळे सुरुवातीला उपस्थित कर्मचाऱ्यांना संशय आला नाही. मात्र काही अधिकाऱ्यांना त्यांच्या हालचाली आणि माहितीबाबत शंका वाटू लागली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशीत संशय बळावला



दोघांकडून विभागीय माहिती, पदनाम, नियुक्तीचे तपशील आणि अधिकृत कागदपत्रांबाबत विचारणा करण्यात आली. सुरुवातीला त्यांनी उत्तरे देण्याचा प्रयत्न केला, मात्र पुढील प्रश्नांवर त्यांची गोंधळलेली उत्तरे संशय वाढवणारी ठरली. उक्ळ विभागातील कामकाजाबाबत त्यांना मूलभूत माहितीही देता आली नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांनी त्यांची कसून चौकशी सुरू केली.

बनावट ओळखपत्रांचा पदार्फाश

तपासादरम्यान दोघांकडे असलेली ओळखपत्रे आणि संबंधित कागदपत्रे तपासण्यात आली. त्यावेळी ती अधिकृत नसून बनावट असल्याचे समोर आले. तसेच त्यांनी वापरलेले उक्ळ नावाचे बॅज आणि ओळखपत्रेही नियमबाह्य असल्याचे निष्पन्न झाले. या उघडकीनंतर पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करत दोघांना ताब्यात घेतले.

नेमका हेतू काय? पोलिसांकडून तपास सुरू

हे दोघे पोलीस आयुक्तालयात नेमक्या कोणत्या उद्देशाने आले होते, याचा तपास सध्या सुरू आहे. सरकारी कार्यालयातील माहिती मिळवणे, प्रभाव निर्माण करणे किंवा अन्य कोणत्या गैरकृत्यासाठी त्यांनी ही बनावट ओळख वापरली होती का, याची चौकशी पोलीस करत आहेत. त्यांच्या पूर्व इतिहासाची आणि संपकार्तील व्यक्तींचीही माहिती गोळा केली जात आहे.

सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न

या घटनेनंतर सरकारी कार्यालयांमधील ओळख पडताळणी प्रक्रियेवर चर्चा सुरू झाली आहे. बनावट अधिकारी बनून थेट पोलीस आयुक्त कार्यालयापर्यंत पोहोचणे ही बाब गंभीर मानली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा घटनांमुळे सुरक्षा यंत्रणांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. प्रत्येक ओळखपत्राची डिजिटल पडताळणी आणि प्रवेश नियंत्रण अधिक मजबूत करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

मिठागरांवर बांधकामे ही पर्यावरणावर आपत्ती



मिठागरांवर मोठ्या प्रमाणावर बांधकामे होत असल्याने पर्यावरणीय समतोल धोक्यात येत आहे. ही जमीन केवळ मीठ उत्पादनासाठीच नाही तर किनारी परिसंस्थेचा महत्त्वाचा भाग म्हणून ओळखली जाते. शहरीकरणाच्या वाढत्या दबावामुळे या नैसर्गिक क्षेत्रांचे रूपांतर निवासी व औद्योगिक बांधकामांमध्ये होत असून, त्याचे दीर्घकालीन परिणाम समाज आणि निसर्ग दोघांवरही आपत्तीसदृश ठरू शकतात.

मुंबईच्या पूर्व उपनगरातील मुलुंड, कांजूरमार्ग आणि भांडुप परिसरातील मिठागरांच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास, पुनर्वसन आणि गृहनिर्माण प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित आहे. विशेषतः धारावी पुनर्विकासातील अपात्र तसेच पात्र लाभार्थी आणि इतर गृहनिर्माण योजनांसाठी या जमिनींचा वापर करण्याची चर्चा सुरू आहे. घरांची वाढती गरज आणि पुनर्वसनाची आवश्यकता मान्य असली तरी, मिठागरांच्या या जागांवर मोठ्या प्रमाणावर बांधकामे केल्यास त्याचे दूरगामी पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम काय होतील, यावर गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर या भागात नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत असून ह्लमिठागर बचाव समिती, मुलुंडह्व यांच्या पुढाकाराने सामाजिक चळवळ उभी राहताना दिसत आहे. मुलुंड पूर्व येथील मिठागरांच्या जागेवर प्रस्तावित गृहनिर्माण प्रकल्पाला स्थानिक नागरिकांकडून तीव्र विरोध व्यक्त केला जात आहे. या प्रकल्पामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती तसेच स्थानिक हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर नुकतीच मुलुंड येथे एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलनाची दिशा, जनजागृती मोहीम आणि पुढील रणनीती यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. समितीकडून ७ जून २०२६ रोजी भव्य जनआंदोलनाचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या चिंता आणि विरोध शांततापूर्ण पद्धतीने मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले. तसेच गेल्या शुक्रवारी आणि येत्या बुधवारी मुलुंड रेल्वे स्टेशन पूर्व परिसरात पत्रक वाटप व जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे. मुलुंडच्या भविष्यासाठी, पर्यावरण संरक्षणासाठी आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी नागरिक एकवटत असून या प्रस्तावित प्रकल्पांबाबतचे आक्षेप आणि चिंता अधिक ठळकपणे समोर येत आहेत. अनेकांना मिठागरे म्हणजे वापरात नसलेली, ओसाड किंवा रिकामी जमीन वाटते. प्रत्यक्षात ही क्षेत्रे किनारी परिसंस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहेत. समुद्राच्या भरती-ओहोटीशी जोडलेली ही जमीन पावसाचे पाणी साठवून ठेवते, भूजल पुनर्भरणास मदत करते आणि अनेक पक्षी, मासे व इतर जीवसृष्टीसाठी अधिवास उपलब्ध करून देते. मुंबईच्या पूर्व किनारपट्टीवरील मिठागरे ही शहराची नैसर्गिक "स्पंज" प्रणाली मानली जातात. अतिवृष्टीच्या काळात मोठ्या प्रमाणावर पाणी शोषून घेण्याची व साठवून ठेवण्याची त्यांची क्षमता असते. मुंबईला दरवर्षी मान्सूनमध्ये जलमय होण्याचा अनुभव येतो. हवामान बदलामुळे अतिवृष्टीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अशा परिस्थितीत मिठागरांवर काँक्रीटचे जंगल उभे राहिल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याची क्षमता मोठ्या प्रमाणावर कमी होईल. २००५ च्या महापुरानंतर विविध तज्ज्ञ समित्यांनी मुंबईतील नैसर्गिक जलनिचरा क्षेत्रांचे संरक्षण करण्याची शिफारस केली होती. मिठागरे नष्ट झाल्यास पावसाचे पाणी साठण्यासाठी उपलब्ध क्षेत्र कमी होईल. परिणामी, पूर्व उपनगरांमध्ये पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढू शकते. मुलुंड, भांडुप, कांजूरमार्ग, विक्रोळी आणि ठाणे परिसरात पूरस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.सांडपाणी व पावसाच्या पाण्याच्या व्यवस्थेवर अतिरिक्त ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. मिठागरांच्या आसपास मोठ्या प्रमाणावर मॅन्ग्रोव्हची वाढ आढळते. मॅन्ग्रोव्ह ही किनारी भागासाठी नैसर्गिक संरक्षणभिंत असते. ती समुद्री लाटांचा प्रभाव कमी करते, कार्बन शोषून घेते आणि अनेक जीवांसाठी अधिवास निर्माण करते. मात्र बांधकामांमुळे मॅन्ग्रोव्ह क्षेत्रांवर दबाव वाढू शकतो. स्थलांतरित पक्ष्यांचे अधिवास नष्ट होऊ शकतात. खाड्या आणि जलमार्गांचे नैसर्गिक संतुलन बिघडू शकते, तसेच जैवविविधतेत घट होण्याची शक्यता निर्माण होते. मुंबईत आधीच काँक्रीटीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. मिठागरे आणि मोकळ्या जागा परिसराचे तापमान नियंत्रित ठेवण्यात मदत करतात. या जागांवर मोठ्या प्रमाणात बांधकाम केल्यास उष्णतेची तीव्रता वाढते, ऊर्जा वापर व वीज मागणी वाढते. लोकसंख्या वाढल्यास वाहतूक, पाणीपुरवठा, मलनिस्सारण आणि कचरा व्यवस्थापन यंत्रणांवर मोठा ताण येतो. योग्य नागरी नियोजन आणि पायाभूत सुविधा नसल्यास गंभीर समस्या निर्माण होतात, जसे माहुल परिसराचे उदाहरण दाखवते. जगभरात किनारी दलदली आणि ओलसर भूभाग जतन करण्यावर भर दिला जात आहे कारण ते हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्तींविरुद्ध संरक्षण देतात. मुंबईतील काही संवेदनशील भागांमध्ये बांधकामे करण्याचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर भविष्यात त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते. धारावीतील झोपडपट्टी पुनर्विकास हा सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. लाखो नागरिकांना सुरक्षित आणि सन्मानजनक घरे मिळणे आवश्यक आहे. मात्र पुनर्वसनासाठी पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आणि पूरनियंत्रणासाठी महत्त्वाच्या जागांची निवड करणे योग्य ठरेल का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.विकास आणि पर्यावरण यामध्ये संघर्ष नसून संतुलन असणे गरजेचे आहे. पुनर्वसनासाठी आधीच विकसित किंवा कमी संवेदनशील भूखंडांचा वापर, जुने औद्योगिक भूखंड, रिकाम्या पडलेल्या सरकारी जमिनी तसेच नियोजनबद्ध पुनर्विकास प्रकल्प यांचा पर्याय विचारात घेता येऊ शकतो. हीच मुलुंडवासियांची मागणी आहे. मुलुंडच्या मिठागरांवरील बांधकाम हा फक्त जमीन वापराचा प्रश्न नसून मुंबईच्या पर्यावरणीय सुरक्षिततेचा, पूरनियंत्रणाचा आणि शाश्वत विकासाचा मुद्दा आहे. या जागा शहराच्या नैसर्गिक संरक्षण यंत्रणेचा भाग आहेत. त्यांचे काँक्रीटीकरण तात्पुरती घरांची समस्या सोडवू शकते, पण दीर्घकाळात पूर, पर्यावरणीय हानी, तापमानवाढ आणि पायाभूत सुविधांवर ताण निर्माण होऊ शकतो. त्यामुळे विकासासोबतच पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन नियोजन गरजेचे आहे.

बारा वर्षांत देशाचे वाजले की बारा...!



मोदींच्या १२ वर्षांत भारताने आर्थिक स्थिरता, इन्फ्रास्ट्रक्चर झेप, डिजिटल क्रांती, गरिबी कमी करणे यात प्रगती केली. जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनली. पण नोकऱ्या, उत्पादन क्षेत्र, असमानता, शेती संकट, सामाजिक एकता यात अपयश आणि अपूर्णता राहिली..

भारतीय राजकारणात 'मोदींची बारा वर्षे, भारताचे बारा वाजले' हे वाक्य विरोधकांच्या भाषेत वारंवार गुणगुणले जाते. काहींसाठी ही अतिशयोक्तीपूर्ण टीका आहे, तर काहींसाठी वस्तुस्थितीचा भाग. २६ मे २०२६ रोजी मोदी सरकार १२ वर्षे पूर्ण करत असताना, या कालखंडाचे संतुलित मूल्यमापन करणे आवश्यक आहे. देशाची अर्थव्यवस्था, बेरोजगारी, शेती, इन्फ्रास्ट्रक्चर, सामाजिक ध्रुवीकरण, भाजपातील मूळ कार्यकर्त्यांची दुर्लक्षिता आणि आरएसएस-भाजपा मतभेद यांचा एकत्रित आढावा घेतला तर सहज लक्षात येईल की देशाची अवस्था काळ- वेळ नाही बरी अशी झालीय.

२०१४ मध्ये नरेंद्र मोदींनी 'अच्छे दिन'चे वचन दिले होते. त्या वेळी भारताचा जीडीपी सुमारे २.०२ ट्रिलियन डॉलर होता. (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आयएमएफ डेटा). २०२६ पर्यंत अर्थव्यवस्था ४.१५ ट्रिलियन डॉलर झाली आहे (आयएमएफ वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक, एप्रिल २०२६). म्हणजे दुप्पट वाढ. आयएमएफ आणि वर्ल्ड बँकनुसार भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था राहिली.

२०२६ साठी ६.५ टक्के वाढीचा अंदाज आहे. विदेशी मुद्रासाठा ३०० अब्ज डॉलरवरून ७०० अब्ज डॉलर पलीकडे गेला. वर्ल्ड बँकच्या ऑक्टोबर २०२५ च्या पॉव्हर्टी अँड इक्विटी ब्रीफनुसार, अत्यंत गरिबी (२.१५ डॉलर प्रतिदिन) २०११-१२ मधील १६.२ टक्क्यांवरून २०२२-२३ मध्ये २.३ टक्क्यांपर्यंत घसरली. सुमारे १७.१ कोटी लोक गरिबी रेषेपासून वर आले. दुसऱ्या अंदाजानुसार ३ डॉलर प्रतिदिन मापदंडानुसार २७.१ टक्क्यांवरून ५.३ टक्क्यांपर्यंत घट झाली, ज्याचा सुमारे २७ कोटी लोकांवर परिणाम झाला. ग्रामीण विद्युतीकरण, स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालये, जल जीवन मिशन अंतर्गत नळाचे पाणी, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरबांधणी आणि यूपीआय क्रांती यांनी लाखो लोकांच्या दैनंदिन जीवनात बदल घडवला. थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) ने भ्रष्टाचार कमी केला. हे यश नाकारता येत नाही.

इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात ठोस प्रगती दिसते. राष्ट्रीय महामार्ग २०१४ मधील ९१ हजार २८७ किलोमीटरवरून २०२५ पर्यंत १ लाख ४६ हजार ३४२ किलोमीटर झाले सुमारे ६० टक्के वाढ (सडक परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, वर्ष समाप्ती अहवाल २०२५). विमानतळांची संख्या ७४ वरून १५० पेक्षा जास्त झाली. वंदे भारत ट्रेन, रेल्वे विद्युतीकरण, उडान योजना यात क्रांती झाली. जी-२० अध्यक्षपद, क्वाड, कलम ३७० हटवणे, राम मंदिर निर्माण हे सांस्कृतिक आणि राजकीय यश मानले जाते.

अपयश आणि आव्हाने देखील मोठी

बेरोजगारी ही सर्वात गंभीर समस्या आहे. २०१४ मध्ये दोन कोटी नोकऱ्या दरवर्षी देण्याचे आश्वासन होते. पीएलएफएस (२०२४-२५) नुसार एकूण बेरोजगारी दर ३.२ टक्क्यांच्या आसपास आहे, पण युवा (१५-२९ वर्षे) बेरोजगारी अजूनही १४-१५ टक्के आहे (पीएलएफएस नोव्हेंबर २०२५). सीएमआयईसारख्या स्वतंत्र संस्था ६-७ टक्केपेक्षा जास्त दर दाखवतात. ९० टक्क्यांपेक्षा जास्त कामगार अजूनही असंघटित क्षेत्रात आहेत. शिक्षित युवकांची बेरोजगारी आणि महिलांचा श्रम सहभाग दर कमी राहिला. त्यामुळे 'जॉबलेस ग्रोथ' ही टीका बरोबर ठरते. मॅन्युफॅक्चरिंगचा जीडीपीमधील हिस्सा १५-१७ टक्क्यांच्या आसपासच राहिला (वर्ल्ड बँक डेटा). मेक इन इंडिया अंतर्गत २५ टक्के लक्ष्य अपुरे राहिले. नोटबंदी (२०१६), जीएसटी सुरुवात आणि कोविड-१९ (जीडीपी ५.८ टक्के घसरण) यांचा छोट्या उद्योगांना मोठा धक्का बसला. असमानता वाढली. टॉप एक टक्के लोकांकडे ४० टक्क्यांपेक्षा जास्त संपत्ती केंद्रित झाली.

शेती क्षेत्रात संकट कायम आहे. तीन कृषी कायदे (२०२०) आणल्याने शेतकरी आंदोलन झाले. कायदे मागे घ्यावे लागले. शेतकरी उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचे लक्ष्य अपुरे राहिले. एमएसपी, इनपूट खर्च, बाजार अस्थिरता आणि शेतकरी आत्महत्या यांचे संकट सुरूच आहे. पीएम-किसान, ई-नाम यात काही फायदा झाला, पण मूलभूत सुधारणा अपुऱ्या राहिल्या. सामाजिक ध्रुवीकरण वाढले. सीएए, एनआरसी, द्वेषपूर्ण भाषण, अल्पसंख्यांक असुरक्षितता यामुळे विभाजन वाढल्याची टीका होत आहे. ईडी, सीबीआय, निवडणूक आयोगसारख्या संस्थांवर पक्षीय वापराचे आरोप झाले. विरोधक नेत्यांवर केस दाखल करण्यात आल्या. आरोग्य आणि शिक्षणात आयुष्मान भारत आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चे प्रयत्न झाले, पण सार्वजनिक खर्च जीडीपीच्या १.५ टक्क्यांच्या आसपासच राहिला. शैक्षणिक परिणाम आणि गुणवत्ता अजूनही आव्हान आहेत.

भाजपातील मूळ कार्यकर्ते दुर्लक्षितच

सत्ता वाढवण्याच्या धडपडीत भाजपाने 'ऑपरेशन लोटस'सारख्या रणनीतीने इतर पक्षातील नेते आणि कार्यकर्ते आणले. यात पैसा, जात, स्थानिक प्रभाव आणि जिंकण्याची क्षमता याला प्राधान्य दिले. परिणामी मूळ भाजपा कार्यकर्ते, आरएसएस पार्श्वभूमीचे स्वयंसेवक दुर्लक्षित झाले. उत्तर प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, हरयाणा, गोवा येथे तिकीट वाटप आणि पदांमध्ये बाहेरच्यांना प्राधान्य मिळाल्याच्या तक्रारी आहेत. जुने कार्यकर्ते बैठकींमध्ये बाजूला राहतात, अपमानित होतात. सत्ता मिळवण्यासाठी व्यावहारिकता वापरणे राजकारणाचे स्वरूप आहे, पण दीर्घकाळात कार्यकर्त्यांची प्रेरणा कमी होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएचे बहुमत कमी होणे यामागे हा एक घटक असू शकतो. मंडल अध्यक्ष निवड, बूथ स्तरावरील कार्यकर्ते यांत जुने निष्ठावंत कार्यकर्त्यांची नाराजी स्पष्ट दिसते. आरएसएस हा भाजपाचा वैचारिक जनक आहे. दोन्हीमध्ये हिंदुत्व, राष्ट्रवादावर मूलभूत सहमती आहे. पण २०१४ नंतर मोदी-शहा यांच्या केंद्रीकृत नेतृत्वामुळे तणाव वाढला. आरएसएस सामूहिक नेतृत्व, तळागाळापासूनचा दृष्टिकोन, स्वदेशी, भ्रष्टाचारविरोधी धोरण, सामाजिक समरसता पसंत करते, तर भाजपा बाजाराभिमुख धोरण, मोठ्या उद्योगपतींना प्रोत्साहन, निवडणूक ध्रुवीकरण यावर भर देते. मोहन भागवत यांनी अहंकार, व्यक्तिपूजा, 'विश्वगुरू' दावा, नवीन विकास मॉडेल यावर अप्रत्यक्ष टीका केली. 'भाजपाच्या दृष्टिकोनातून आरएसएस बघणे ही मोठी चूक' असे विधान केले. आरएसएसने बाहेरून आलेल्यांना महत्त्व आणि सत्ता केंद्रीकरणावर चिंता व्यक्त केली. २०२४ नंतर तणाव अधिक स्पष्ट झाला. आरएसएस 'कुटुंबातील मतभेद' म्हणते, पण मूळ संघर्ष विचार शुद्धता विरुद्ध निवडणूक यश यात आहे. आरएसएस दीर्घकालीन हिंदू समाजाचे संगठन करू इच्छिते, तर भाजपा सत्ता टिकवण्यासाठी तडजोड करते.

बारा वर्षांत बारा वाजले

मोदींच्या १२ वर्षांत भारताने आर्थिक स्थिरता, इन्फ्रास्ट्रक्चर झेप, डिजिटल क्रांती, गरिबी कमी करणे यात प्रगती केली. जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनली. २०१४ पूर्वीच्या धोरण अस्थिरता आणि भ्रष्टाचाराच्या तुलनेत शासन वितरण सुधारले. पण नोकऱ्या, उत्पादन क्षेत्र, असमानता, शेती संकट, सामाजिक एकता यात अपयश आणि अपूर्णता राहिली. 'सर्व आघाड्यांवर अपयश' हे अतिरंजित असेलही, पण 'सर्व आघाड्यांवर यश' हेही अतिशयोक्तीपूर्ण आहे. सत्ता मिळवण्यासाठी यंत्रणांचा वापर, संस्था, मीडिया व्यवस्थापन हे सर्व पक्ष करतात. पण भाजपाने मुळे विसरू नयेत. मूळ कार्यकर्त्यांना आदर, पारदर्शक तिकीट वाटप, कामगिरी आधारित प्रणाली हवी. आरएसएस-भाजपा मतभेद कुटुंबातील आहेत, पण ते हाताळले गेले नाहीत तर दीर्घकाळात संघटनात्मक कमकुवतपणा येऊ शकतो. भारताची क्षमता प्रचंड आहे. लोकसंख्येचा लाभांश, युवा शक्ती, तंत्रज्ञान प्रतिभा, लोकशाही यांचा फायदा घेऊन २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होणे शक्य आहे. पण त्यासाठी श्रम-केंद्रित उत्पादन, शिक्षण-कौशल्य क्रांती, शेती सुधारणा, समावेशक वाढ, संस्थात्मक विश्वासार्हता पुनर्स्थापित करणे गरजेचे आहे. ध्रुवीकृत राजकारण सोडून पुरावा आधारित धोरणे हवी. 'बारा वाजले' हे विधान राजकीय टीका आहे. यश नाकारता येत नाहीत, अपयश दुर्लक्षित करता येत नाहीत. १२ वर्षे सत्तेत राहिल्यावर पक्ष मुळे विसरतात. भाजपा आणि आरएसएस यांनी संतुलन साधणे आवश्यक आहे. भारताचे भविष्य फक्त एका व्यक्ती किंवा पक्षावर अवलंबून नाही, तर सामूहिक प्रयत्नांवर आहे. सुज्ञास अधिक सांगणे न लगे!

इंधन संकटाने महाराष्ट्र वेठीस, सरकार झोपेत



ग्रामीण भागाला प्राधान्याने डिझेल पुरवठा, साठेबाजीवर कठोर कारवाई आणि पुरवठा साखळीतील अडथळे दूर करणे आवश्यक आहे. अन्यथा पेट्रोल पंपांवरील रांगा उद्याच्या जनआक्रोशात परिवर्तित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवरच असेल.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पेट्रोल-डिझेलच्या टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले. अनेक जिल्ह्यांतील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. काही ठिकाणी शेतकऱ्यांना डिझेलसाठी तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे, तर अनेक पंपांवर 'डिझेल उपलब्ध नाही' अशा पाट्या झळकत आहेत. खरीप हंगामाच्या उंबरठ्यावर निर्माण झालेली ही परिस्थिती ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. मात्र सरकारकडून या संकटाची तीव्रता मान्य करण्याऐवजी 'टंचाई नाही' असा खोटा दावा करून वास्तव झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सरकारचे दावे फोल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने राज्यात इंधन टंचाई नसल्याचे सांगत आहेत. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र वेगळे आहे. जर परिस्थिती नियंत्रणात असेल, तर पेट्रोल पंपांवर मध्यरात्रीपासून रांगा का लागत आहेत? शेतकरी डिझेलच्या शोधात गावोगाव का फिरत आहेत? ट्रॅक्टर, पंपसेट आणि शेती मशागतीची यंत्रे ठप्प का पडत आहेत? गेल्या आठ दिवसांत पेट्रोल, डिझेलच्या दरात प्रति लिटर ८ रुपये आणि सीएनजीच्या दरात प्रति किलो ५ रुपयांपेक्षा अधिकची वाढ झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरवाढीमुळे खाद्यपदार्थांच्या किमतीत अगोदरच वाढ झालेली आहे. त्यामुळे सरकारच्या दाव्यांपेक्षा जमिनीवरील वास्तव खूप गंभीर आहे.

प्रसिद्धी स्टंट

पंतप्रधानांनी इंधनाचा वापर जपून करण्याचे सांगितल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी एक दिवस बुलेटने फिरण्याची स्टंटबाजी केली. पण त्या बुलेटस्वारीचे फोटो आणि व्हिडीओ शूट करण्यासाठी ८-१० कॅमेरे आणि गाड्या वापरल्या जात होत्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एस कार वापरायला सुरुवात केली, पण त्यांच्या मागेपुढे डिझेल, पेट्रोलवर चालणाऱ्या किमान डझनभर गाड्या असतात. सत्ताधारी पक्षाचे बहुतांश मंत्री आणि आमदार लँड क्रुझर, रेंज रोव्हर, डिफेंडर अशा गाड्या वापरतात. ज्या एक लिटरमध्ये फक्त ३ किलोमीटरच्या आसपास चालतात. प्रचाराची नौटंकी सोडली तर सत्ताधारी पक्षाकडून उधळपट्टी सुरू आहे.

दिव्याखाली अंधार

राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी या परिस्थितीस 'काळाबाजार' कारणीभूत असल्याचे सांगत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यात तापी नदीपात्रात हजारो जेसीबी पोकलेन आणि डंपर दिवसरात्र वाळू उपसा आणि वाहतूक करत आहेत. त्यांना हे डिझेल कुठून मिळत आहे. काळ्या बाजारातून? काळ्या बाजारामुळे कृत्रिम टंचाई निर्माण होत असेल, तर ती रोखण्याची जबाबदारी सरकारची नाही का? साठेबाजी होत असेल तर प्रशासन काय करत होते? हे सर्व माफिया सत्ताधारी पक्षाच्या जवळचे आहेत. त्यामुळे त्यांना सरकारी आशीवार्दासोबत टंचाईच्या काळात डिझेलचा सुरळीत पुरवठाही सुरू आहे. हातात कॅन घेऊन दिवसभर पंपावर उभ्या असणाऱ्या शेतकऱ्यांना काळा बाजार करतात असे म्हणणाऱ्या गिरीष महाजनांच्या जिल्ह्यात तापी नदीतून अवैधपणे जी रेतीची लूट सुरू आहे त्यासाठी लागणारे डिझेल काळ्या मागार्ने येती की गोऱ्या मागार्ने यावर कधी चकार शब्द काढला नाही.

प्रशासन आणि माफियांची युती

राज्यात सगळीकडे अवैध रेती उत्खनन करणारे डंपर, जेसीबी आणि पोकलेन मशीन दिवस-रात्र सुरू आहेत. त्यांना रोज हजारो लिटर डिझेल मिळत आहे. जर पुरवठा कमी असेल, तर हा इंधन पुरवठा कोणाच्या आशीवार्दाने सुरू आहे? अवैध रेती उत्खननाचा पर्यावरणावरही गंभीर परिणाम होत आहे. नदीपात्रांची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून भूजल पातळी खालावत आहे. गावांचे नैसर्गिक संतुलन बिघडत आहे. तरीही प्रशासनाकडून कठोर कारवाई होताना दिसत नाही. डिझेल टंचाईच्या काळातही माफियांची यंत्रणा खंडित न होणे हे प्रशासनातील साटेलोट्याचेच निदर्शक आहे.

खरीप हंगाम संकटात


खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच डिझेलची कमतरता निर्माण होणे अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्रातील बहुतांश शेती यांत्रिकीकरणावर अवलंबून आहे. मशागत, पेरणी, सिंचन आणि वाहतूक या सर्व प्रक्रियांमध्ये डिझेल महत्त्वाची भूमिका बजावते. वेळेत मशागत झाली नाही तर पेरणी उशिरा होते आणि त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. आधीच वाढत्या उत्पादन खचार्मुळे त्रस्त असलेला शेतकरी दुहेरी संकटात आहे. पंतप्रधानांनी 'खते कमी वापरा' असे आवाहन केले. बियाणे, खते, औषधे आणि इंधन यांच्या वाढत्या किमतींनी शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे. त्यात हवामानातील अनिश्चितता आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे ग्रामीण भागातील अस्वस्थता वाढली आहे. बळीराजाचा गौरव फक्त सत्ताधाऱ्यांच्या भाषणांपुरता मर्यादित राहिला असून धोरणांच्या केंद्रस्थानी शेतकरी दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे. कांदा उत्पादक शेतकरी आधीच मोठ्या आर्थिक संकटात आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव कोसळले आहेत. अनेकांना कांदा रस्त्यावर फेकण्याची वेळ आली आहे. काही ठिकाणी दहा-दहा क्विंटल कांदा विकल्यानंतरही हातात १० रुपयेही पडत नाहीत. त्यात आता डिझेल टंचाईमुळे वाहतूक खर्च वाढला असून कृषिमाल बाजारात नेणेही कठीण बनले आहे.

पारदर्शकतेचा अभाव

सरकारचा आणखी एक गंभीर दोष म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. पुरवठा विस्कळीत का झाला, परिस्थिती किती गंभीर आहे आणि ती पूर्ववत होण्यासाठी किती वेळ लागणार, याबाबत सरकार स्पष्ट बोलत नाही. परिणामी अफवा पसरून साठेबाजी वाढत आहे आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. लोकशाही व्यवस्थेत संकटाच्या काळात सरकारने जनतेशी प्रामाणिक संवाद साधणे अपेक्षित असते. परंतु येथे सरकारची भूमिका वास्तव नाकारण्याचीच भूमिका दिसते. दरम्यान, सरकारमधील नेते विधान परिषदेच्या राजकारणात आणि सत्तासमीकरणांत व्यस्त आहेत. कोणाला उमेदवारी द्यायची, कोणाला मंत्रिपद मिळणार यावर चर्चा सुरू असताना ग्रामीण महाराष्ट्र मात्र इंधन टंचाईच्या झळा सहन करत आहे. सामान्य माणसांच्या वेदनांकडे अजिबात लक्ष नाही. पेट्रोल-डिझेल टंचाईचा प्रश्न हा केवळ इंधन पुरवठ्यापुरता मर्यादित नाही; तो ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वाशी जोडलेला आहे. शेती अडली की गावांची बाजारपेठ मंदावते, रोजगार घटतो आणि आर्थिक ताण वाढतो. त्यामुळे हे संकट सामाजिक आणि मानसिक पातळीवरही परिणाम करणारे आहे.

इंधन टंचाई जीवावर

ग्रामीण भागातील इंधन टंचाई आता लोकांच्या जीवावर उठली आहे. हिंगोलीत रुग्णवाहिकेला डिझेल नसल्याचे कारण देत गरोदर महिलेला रुग्णवाहिका नाकारण्यात आली. यामुळे रुग्णालयात पोहोचायला उशीर झाल्याने तिच्या पोटातच बाळाचा मृत्यू झाला. दोन आठवड्यांपूर्वी नागपूर पोलिसांनी वाहनांत डिझेल नाही म्हणून एका बेपत्ता मुलीचा शोध घेण्यास नकार दिला होता. राज्याच्या ग्रामीण भागात अशा घटना रोज घडत आहेत. सरकारने आता तरी वास्तव स्वीकारून तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. ग्रामीण भागाला प्राधान्याने डिझेल पुरवठा, साठेबाजीवर कठोर कारवाई आणि पुरवठा साखळीतील अडथळे दूर करणे आवश्यक आहे, अन्यथा पेट्रोल पंपांवरील रांगा उद्याच्या जनआक्रोशात परिवर्तित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवरच असेल. महाराष्ट्रातील जनता संयमी आहे, पण तिच्या सहनशीलतेलाही मर्यादा आहेत. जनतेच्या वेदना नाकारून सत्ता फार काळ टिकत नाही, हे इतिहासाने अनेकदा दाखवून दिले आहे.



'टॅलिस्मान' विजय

'टॅलिस्मान' म्हणजे नशीब फिरवणारा ताईत. सध्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू साठी हा ताईत म्हणजे विराट कोहलीच. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर त्याने पुन्हा एकदा आपल्या अनुभव आणि सातत्याने संघाला महत्त्वपूर्ण विजय मिळवून दिला.

टॅलिस्मानह्व म्हणजे गळ्यातील ताईत. विराट कोहली सध्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघासाठी अशाच ताईतासारखा ठरला. काल अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर त्याने आपल्या संघाला मिळवून दिलेला विजय केवळ आरसीबीसाठीच नव्हे, तर अनेक भारतीय चाहत्यांसाठीही संस्मरणीय ठरला. विराट कोहली सध्या ३७ वर्षांचा आहे. त्यामुळे तो पारंपरिक अथार्ने विशेषतः कसोटी क्रिकेटमध्ये आधीइतका सक्रिय दिसत नाही. भविष्यात त्याला संधी मिळू शकते, पण सध्याच्या घडीला तो प्रामुख्याने मर्यादित षटकांच्या क्रिकेटवर लक्ष केंद्रित करत आहे. टी-२० क्रिकेटमध्ये मात्र तो अजूनही आपली चमक कायम ठेवत आहे. कालच्या सामन्यातही त्याने गुजरात टायटन्ससारख्या बलाढ्य संघाविरुद्ध आपल्या फलंदाजीने आणि मैदानावरील उत्साही उपस्थितीने प्रभाव टाकला. गुजरात टायटन्सची गोलंदाजी साधारणतः भक्कम मानली जाते, ज्यात कागिसो रबाडासारखे दर्जेदार गोलंदाज आहेत. तरीही विराटच्या आक्रमक खेळापुढे त्यांना प्रभावी कामगिरी करता आली नाही आणि गुजरातचा संघ १५६ धावांत गारद झाला. जेथे एका दिवसात दोन्ही संघ मिळून पाचशे ते साडेपाचशे धावा करतात, तेव्हा असे आव्हान काहीच मोठे वाटत नाही. हेच तर काल विराटच्या संघाने दाखवून दिले. गुजरातने दिलेले आव्हान खरे तर ते आव्हानच नव्हते.आरसीबीने ते अगदी पाच विकेट्स आणि बरेच चेंडू राखून सहज पार करत विजेतेपदाला गवसणी घातली. यामुळे आरसीबी हा संघ केवळ एकाच खेळाडूवर अवलंबून नाही, हे सिद्ध करणारा विजय होता. विराटच्या या कामगिरीचे कौतुक करावे तितके थोडेच आहे आणि त्याबद्दल संपूर्ण आरसीबी संघ त्याच्याप्रति कृतज्ञ राहील. विराट हा असा खेळाडू आहे, की ज्याने आपला संघ किंवा फ्रँचायझी कधीही बदलली नाही. आयपीएल सुरू झाल्यापासून तो आरसीबीकडूनच खेळत आहे. या काळात संघाचे मालक बदलले. किंगफिशरच्या विजय मल्ल्यांपासून ते आता बिर्ला समूहापर्यंत विराट मात्र तिथेच स्थिर राहिला आहे. विराट कोहलीच्या नेतृत्वाखालील संघाने अलीकडच्या सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या संघाची गोलंदाजी आणि फलंदाजी दोन्हीही प्रभावी ठरली. विशेष म्हणजे या संघात आता असा सकारात्मक बदल दिसतो की संपूर्ण संघ एका खेळाडूवर अवलंबून राहत नाही. एखाद्या सामन्यात एखादा खेळाडू अपयशी ठरला तरी दुसरा खेळाडू पुढे येऊन जबाबदारी स्वीकारतो आणि संघाला विजय मिळवून देतो. हीच गोष्ट कोणत्याही यशस्वी संघाची खरी ओळख असते. सध्याच्या क्रिकेट जगतात एक गंभीर मुद्दा पुढे येतो, तो म्हणजे इंडियन प्रीमियर लीगची बदलती लोकप्रियता आणि क्रिकेटवरील त्याचा परिणाम. आजकाल वर्षभर विविध टी-



दररोज एक ग्लास ताक पिण्याने होतात हे फायदे

दही अथवा ताक शरीरासाठी उत्तम आहे आपल्याला माहीतच असेल. कारण अगदी प्राचीन काळापासून जेवणासोबत ताक पिण्याची पद्धत आहे. विशेषतः जड जेवणासोबत फोडणीचे अथवा मसाला ताक पिणे फायदेशीर ठरते. आयुर्वेदात तर ताकाला अमृतपेय असं म्हटलं जातं. कारण ताकामुळे तुमच्या शरीरातील टॉक्सिन्स अर्थात विषद्रव्ये बाहेर टाकली जातात. शरीरातील उष्णता आणि दाह कमी करण्यासाठी ताक एखाद्या औषधाप्रमाणे काम करतं. दह्यात भरपूर पाणी टाकून घुसळून ताक केलं जातं. त्यामुळे दही आणि ताक यांचे शरीरावर होणारे फायदे नक्कीच वेगवेगळे आहेत. ताक प्यायल्यामुळे शरीर हायड्रेट राहतं. ज्यामुळे शरीराची पाण्याची पातळी संतुलित राहण्यास मदत होते.यासाठीच ताकाचे हे आरोग्यदायी फायदे जरूर जाणून घ्या.

ताकाचे आरोग्यदायी फायदे

ताक प्यायल्यामुळे तुमची पचनशक्ती सुधारते. म्हणूनच जड जेवणासोबत ताक पिणे योग्य ठरते. अशा ताकात जिरेपूड, आलं आणि सैंधव मीठ असेल तर ताकाचा चांगला परिणाम शरीरावर लवकर होतो.

ताकामध्ये कॅल्शियम, लोह, फॉस्फरस, पाणी असते ज्यामुळे तुम्हाला त्वरीत उर्जा मिळते. यासाठी अशक्तपणा अथवा थकवा दूर करण्यासाठी ताक पिणे फायदेशीर ठरते.

ताक हे दह्यापासून तयार केलं जातं. ज्यामुळे ताकात पुरेशे कॅल्शियम असतं. ताक नियमित पिण्यामुळे तुमच्या शरीराची कॅल्शियमची कमतरता भरून निघू शकते.

दह्यात भरपूर पाणी मिसळून आणि घुसळून ताक केले जाते ज्यामुळे ताक पिण्याने तुमच्या शरीरातील पाण्याची पातळी नियंत्रित राहते आणि तुम्हाला डिहायड्रेशनचा त्रास होत नाही. यासाठी उन्हाळ्यात ताक दररोज प्यावे.

जुलाब होत असतील तर अशा व्यक्तीने ताप पिणे योग्य ठरते. कारण ताकामुळे शरीरात पाण्याची झालेली झीज भरून निघण्यास मदत होते.

काही लोकांना दही खाण्यामुळे सर्दी, खोकल्याचा त्रास होतो मात्र अशा लोकांनी ताक प्यायल्यास त्यांना हा त्रास नक्कीच होत नाही.

ताकामुळे वजन कमी होण्यास मदत होते. जर तुम्ही वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करत असाल तर दररोज जेवणाच्या मधल्यावेळात भुक लागल्यावर ताक प्या. यामुळे तुमची भुक तर भागेलच शिवाय तुमचे वजनदेखील वाढणार नाही.

दह्यामध्ये प्रोबायोटिक्स असतात जे तुमच्या शरीरातील हानिकारक जीवजंतूच्या वाढीस प्रतिरोध करतात. ज्यामुळे तुम्हाला आजारपणाचा धोका कमी होतो.

ताक पिण्यामुळे शरीरात बॅड कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते. ज्यामुळे तुमचा रक्तदाबदेखील नियंत्रणात राहण्यास मदत होते. रक्तदाब नियंत्रित असल्यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारते.

ताक चवीला आंबटगोड लागते. ताक पाचक असल्यामुळे ते शरीरातील इतर पदार्थांचे योग्य पचन करण्यास मदत करते.

ताकामुळे वातविकार, पित्तविकार आणि कफविकार बरे होतात. त्यामुळे ते त्रिदोषनाशक आहे.

सब्जा खाण्याचे गुणकारी फायदे



तुळस भारतीय घरांतील पूजनीय झाड आहे. अनेक घरांमध्ये तुळशीचं रोपटं लावलेलं पाहायला मिळतं. तुळस अनेक आजारांवर औषधी म्हणून काम करते. तुळशीचं बी म्हणजेच सब्जा शरीरासाठी अतिशय गुणकारी आहे. उन्हाळ्याच्या दिवसात सब्जाचं सेवन केल्याने शरीरात होत असलेला दाह कमी करण्यास मदत होते. सब्जा आपल्या शारीरिक विकासासोबतच मानसिक विकासासाठीही लाभदायक ठरतो. सब्जामध्ये कॅलरीज, प्रोटिन, काबोर्हायड्रेट, विटॅमिन ए, के, ई, बी, मॅग्नेशियम, फायबर, कॅल्शियम आणि पोटॅशियम असतं.

वजन कमी करते –

सब्जा वजन कमी करण्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. सब्जामध्ये अल्फा-लिनोलेनिक ॲसिड असतं. यामुळे शरीरातील पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. सब्जामध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असतं त्यामुळे भूक नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

बद्धकोष्ठतेचा त्रास –

बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास सब्जा गुणकारी ठरतो. सब्जा शरीरातील डिटॉक्सिफिकेशनच्या प्रक्रियेत मदत करते आणि पोट, पचन क्रिया सुरळित करुन आतड्यांचे कार्य चांगले ठेवते. गरम पाण्यात सब्जा भिजवून रोज रोत्री दुधासोबत घेतल्याने फायदा होतो. सब्जामुळे गॅससंबंधी समस्या दूर होण्यास मदत होते. पोटातील जळजळ, ॲसिडिटी कमी करण्यासही मदत होते.

त्वचा –

प्रदूषणामुळे त्वचेवर मोठा परिणाम होत असतो. परंतु सब्जा त्वचेला ठीक करण्यासाठी फायदेशीर ठरतो. नारळाच्या तेलात सब्जा भिजवून त्याने त्वचेवर मसाज करा. त्यामुळे त्वचा तजेलदार होण्यास मदत होते.

केसांसाठी फायदेशीर –

प्रदूषणामुळे केस निर्जीव होतात. सब्जात असणारी विटॅमिन, लोह, प्रोटिन अशी पोषक द्रव्ये केसांसाठी उपयोगी ठरतात. तेलात सब्जा भिजवून लावल्याने केस चमकदार होण्यास मदत होते.

या आजारांवर गुणकारी –

मानसिक समस्या म्हणजेच टेन्शन, डिप्रेशन, मायग्रेन यांसारख्या आजारांवर सब्जा फायदेशीर ठरतो. सब्जाच्या सेवनाने उत्साही वाटते. उन्हाळ्याच्या दिवसांत पोट थंड राहते. सब्जाच्या सेवन केल्याने खाल्यानंतर पोटात ॲसिडिसी कमी होते. रोगप्रतिकारशक्ती वाढते. सब्जामुळे शरीरातील टॉक्सिन दूर होतात. त्यामुळे अनेक छोट्या-छोट्या समस्या कमी होतात. तसेच शरीराला एनजीर्ही मिळते.

हृदयाच्या आरोग्यासाठी लसूण हा रामबाण उपाय आहे

तज्ज्ञांच्या मते, हृदयाच्या आरोग्यासाठी लसणाचे सेवन सर्वोत्तम पर्याय आहे. याच्या सेवनाने कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते. हे एलडीएलचे ऑक्सिडेशन प्रतिबंधित करते. अनेक अभ्यासात असे आढळून आले आहे की लसणात अनेक औषधी गुणधर्म आहेत जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात आणि हृदयाच्या गंभीर आजारांचा धोका कमी करतात. रक्तदाब कमी करण्यासाठी देखील लसूण हे एक महत्त्वाचे औषध असू शकते.

लसूण यकृत कसे निरोगी ठेवते?

लसणात सल्फर कंपाऊंड असते जे यकृतमधील एंजाइम सक्रिय करते. याचे सेवन केल्याने शरीरातील टॉक्सिन बाहेर टाकण्यास मदत होते. त्यात सेलेनियम देखील असते जे यकृताला नुकसान होण्यापासून वाचवते.



लसूण किडनी निरोगी ठेवते – लसणातही किडनी निरोगी ठेवणारे गुणधर्म असतात. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, लसणात ॲलिसिन आढळते, ज्यामुळे किडनी निरोगी राहते आणि अनेक आजारांपासून बचाव होतो. किडनी निरोगी ठेवण्यासाठी रोज सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या पाकळ्या खाव्यात.

पचनक्रिया सुधारते – लसूण रोज खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. लसणाच्या सेवनाने आतड्याची जळजळ कमी होते. याचे सेवन केल्याने गॅस आणि अपचनापासून आराम मिळतो.

संत्र्यांपेक्षा या फळांमध्ये असते जीवनसत्त्व 'सी'चे प्रमाण जास्त!

आपण आपल्या शरीराला उर्जा देण्यासाठी, आपलं आरोग्य निरोगी राखण्यासाठी, विषाणू आणि संक्रमणांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी हर्ब्सचे सेवन करतो. कारण हर्ब्स हे मुळातच उष्ण असतात आणि त्यामुळे आपल्या शरीराला उर्जा मिळते आणि शरीर स्वस्थ सुद्धा राहते. यामुळे आपले पचन कार्य सुधारते, रक्त प्रवाहात सकारात्मक बदल होतो, रोगप्रतिकार शक्ती वाढते. परंतु जस जसा उन्हाळा सुरु होतो तसे आपण या हर्ब्सचे सेवन करू शकत नाही. कारण हे हर्ब्स गरम असतात आणि उन्हाळ्यात शरीराला उष्ण नाही तर थंड पदार्थांची गरज असते. म्हणून आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत अशा फळांबद्दल ज्यातून तुम्हाला उन्हाळ्यात आवश्यक असलेले जीवनसत्व 'सी ' मोठ्या प्रमाणात मिळेल. चला तर जाणून घेऊया या फळांविषयी अधिक माहिती !



उन्हाळ्यात कोणत्या फळांतून मिळते जीवनसत्व 'सी' - आता प्रश्न हा निर्माण होतो की नक्की कोणते पदार्थ खावेत जेणेकरून उन्हाळ्यातील गरमीचा प्रभाव सुद्धा आपल्या शरीरावर होणार नाही आणि ताप, सर्दी यांसाख्या संक्रमणांपासून सुद्धा आपला बचाव होईल. तर मंडळी, याचं उत्तर आहे सायट्रस फ्रुट. या सायट्रस फळांमध्ये सर्वात वरची नावं आहेत मोसंबी आणि संत्री, जी मुख्यतः हिवाळ्यातील फळे आहेत. त्यामुळे जरी उन्हाळ्यात तुम्हाला हि फळे मिळाली तरी त्याचे सेवन न करणे उत्तम! कारण उन्हाळ्यात यांचे सेवन करून आपण आपल्याच शरीराला धोका निर्माण करू. तर मग या फळांना कोणते पर्याय आहेत का? जी फळे उन्हाळ्यात खाल्ल्याने जीवनसत्व 'क' सुद्धा मिळेले आणि शरीराला धोकाही उत्पन्न होणार नाही? हो आहेत ना, चला आता त्यांच्याबद्दल माहिती घेऊ.

किवीचे सेवन करा - किवी हे फळ आता सगळ्यांनाच माहित झाले आहे. आता हे फळ बाजारात सहज उपलब्ध सुद्धा होते आणि फळ नसले तर बाराही महिने किवीच्या फळाचा रस सुद्धा उपलब्ध असतो. हे फळ आपल्या शरीराची जीवनसत्व 'सी' ची गरज मोठ्या प्रमाणावर भरून काढते. दरोरोज एक किवीचे फळ खाल्ल्याने शरीराला आवश्यक असलेले जीवनसत्व 'सी ' मिळते. सोबतच ताप, डेंग्यू सारख्या संक्रमण होणाऱ्या आजारांपासून सुद्धा आपला बचाव होतो. हे यामुळे होते कारण हे फळ आपल्या शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवते.

सलाडमधील टोमॅटो - तुम्ही हि गोष्ट बऱ्याच जणांकडून ऐकली असेल की उन्हाळ्याच्या ऋतूत टोमॅटो हे शिजवून खाणे किंवा त्याची भाजी करून खाणे शरीराला घातक ठरू शकते. पण हाच टोमॅटो जर तुम्ही सलाड मध्ये खाल्लात किंवा फक्त कापून खाल्लात तर त्यातून तुम्हाला मोठ्या प्रमाणावर जीवनसत्व 'क' आणि लाईकोपीन मिळेल. उन्हाळ्याच्या काळात टोमॅटोचा ज्यूस पिणे देखील फायदेशीर ठरू शकते. हिवाळ्याच्या काळात याच्या उलट टोमॅटोचे सूप पिणे लाभदायक ठरते.

फळांचा राजा आंबा - उन्हाळ्यातील सर्वांचे आवडते फळ म्हणजे फळांचा राजा आंबा! तुम्हाला माहित असेलच की आंबे अनेक प्रकारचे असतात. त्यांचा केवळ आकार वेगळा नसतो तर चव सुद्धा वेगवेगळी असते. मे महिन्यापर्यंत विविध प्रकारचे हे आंबे आपल्या जिभेची चव भागवण्यासाठी आणि शरीराला थंडावा देण्यासाठी बाजारात उपलब्ध झालेले असतात. आंबा पिकलेला असो की कच्चा त्याचे सेवन नियमित रूपाने आणि योग्य प्रमाणात केले तर अनेक आजार तुमच्या आसपास सुद्धा भटकणार नाहीत. जर तुम्हाला उन्हाळ्यात जीवनसत्व 'सी' मोठ्या प्रमाणात आपली शरीराला द्यायचे असेल तर आवर्जून तुम्ही आंब्याचे सेवन करा.

अननस - अननस हे एक उन्हाळ्यातील प्रसिद्ध फळ आहे. उन्हाळ्यात आपले शरीर आणि मेंदू थंड ठेवण्यासाठी अननसाचा खूप फायदा होतो. हे फळ खाताच किंवा याचा ज्यूस पिताच आपले मन सुद्धा फ्रेश होते. अननसामध्ये जीवनसत्व 'क' चे प्रमाण खूप असते. म्हणून दररोज दुपारच्या वेळेस या फळाचे सेवन आवर्जून करावे. तुम्ही तुमच्या सोयीसाठी वर सांगितल्या फळांचे रोज एक या प्रमाणे ठरवून सेवन करू शकता. यामुळे तुम्हाला प्रत्येक फळांतील पोषक घटक मिळत जातील.

'चोको-कोको नगेट्स'

साहित्य:

टॉपींगसाठी::

- १/२ कप ओल्या नारळाचा चव
- ३ टेस्पून साखर
- २ टेस्पून दुध
- १७५ ग्राम चोकॉलेट

कृती :

- मध्यम आकाराच्या नॉनस्टीक भांड्यात नारळ, साखर आणि दूध मिक्स करावे. मध्यम आचेवर शिजवावे. सतत ढवळावे.
- मिश्रण घट्टसर बनले की आच बंद करावी. मिश्रण एका प्लेटमध्ये काढून घ्यावे. थंड होवू द्यावे. त्याचे १ इंचाचे गोळे बनवावे. १५ मिनिटे फ्रीजमध्ये ठेवावे.
- प्लास्टीकचा जाड कागद किंवा अलुमिनियम फॉईलचा तुकडा तयार ठेवावा.
- चॉकलेट बारीक चिरून घ्यावे. डबल बॉइलरमध्ये ठेवून वितळवून घ्यावे. त्यासाठी एका मोठ्या पातेल्यात पाणी गरम करत ठेवावे. त्याच्या आतील आकाराचे दुसरे एखादे भांडे किंवा वाडगे घ्यावे. त्यात चॉकलेट घालावे. हे भांडे अधांतरी ठेवून हाताने किंवा पक्कडीने धरून ठेवावे. फक्त २ ते ३ इंच तळ पाण्यात बुडवावा. खालील पातेल्यातील पाणी अजिबात यात शिरू देऊ नये. चॉकलेट सतत ढवळा म्हणजे पाण्याच्या उष्णतेने हळूहळू चॉकलेट वितळेल.
- चॉकलेट वितळले की नारळाचे गोळे यात बुडवून बाहेर काढा. प्लास्टिकच्या कागदावर ठेवा. थोडावेळ फ्रीजमध्ये सेट होण्यासाठी ठेवा. नंतर सर्व्ह करा.
- जर हवा थंड असेल तर फ्रीजमध्ये ठेवण्याची आवश्यकता नसते. पण उकाड्यात चॉकलेट वितळते. अशावेळी फ्रीजमध्ये ठेवावे. खायच्या आधी २० मिनिटे बाहेर काढावे.

या कारणांमुळे कपाळावर वारंवार येतात मुरुम, करा हे रामबाण उपाय

उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तिन्ही ऋतूंमध्येही त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. कारण हवामान बदलाचा आपल्या संपूर्ण आरोग्यावर परिणाम होतो. कपाळावर मुरुम येणे ही समस्या तशी सामान्य असली तरीही प्रचंड वेदनादायक आहे. मुरुमांमुळे आपलं सौंदर्य बिघडतं. त्वचा सुंदर असेल, तर आत्मविश्वास वाढतो. मात्र संवेदनशील त्वचा असेल, तर प्रचंड देखभाल घ्यावी लागते. मुरुमांच्या समस्येनं हैराण असलेले काही जण सहजासहजी लोकांमध्ये मिसळत नाहीत. यामागील कारण केवळ मुरुम आणि त्यापासून निर्माण झालेले डाग. चेहऱ्यावर मुरुम येण्याच्या समस्येमागील मुख्य कारण बऱ्याचदा अनुवंशिक असते. या त्रासाकडे दुर्लक्ष न करता योग्य पद्धतीनं त्वचेची काळजी घेणे आवश्यक आहे. कारण त्वचेचं सौंदर्य टिकवणं हे पूर्णतः आपल्या हातात असतं. खाण्यापिण्याच्या सवयी, सौंदर्यप्रसाधनं तुमच्या त्वचेला साजेशी असावीत. कपाळावरील मुरुमांपासून सुटका करून घेण्यासाठी जाणून घेऊया उपाय.



कपाळावर मुरुम येण्यामागील कारणे

तुमच्या कपाळावर येणाऱ्या मुरुमांचा आकार तसंच त्यांचा रंग किती गडद लाल आहे, यानं काहीही फरक पडत नाही. कारण चेहऱ्यावर कुठेही मुरुम येणे ही बाब त्रासदायकच असते. सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही कोणते उपाय करत आहात, हे जास्त महत्त्वाचे आहे. धूळ, माती, प्रदूषण आणि त्वचेची देखभाल योग्य पद्धतीनं न केल्यासही कपाळावर मुरुम येतात. पुरळ, मुरुम येण्याची याव्यतिरिक्तही बरीच कारणे आहेत. या समस्येकडे अजिबात दुर्लक्ष करू नका.

चेहऱ्यावरील छिद्रे बंद होणे

आपल्या त्वचेमध्ये तैलग्रंथी असतात. ज्याद्वारे चेहऱ्यावर नैसर्गिक स्वरुपातील तेल तयार होते, ज्यास सीबम असे म्हणतात. तैलग्रंथीमुळे त्वचेला आर्द्रता मिळते आणि सोबतच त्वचेचं संरक्षणही होतं. पण सीबमचा स्त्राव गरजेपेक्षा अधिक वाढल्यास त्वचेवरील छिद्रे बंद होतात. ज्यामुळे मुरुमांची समस्या उद्भवते. निरोगी त्वचेसाठी रोज अडीच ते तीन लीटर पाणी प्यायलाच हवे. शिवाय शीतपेय पिणे टाळा. त्याऐवजी, पाणी, शहाळं, लिंबू पाणी, ताक पिण्यावर भर द्या.

हार्मोनमधील बदल आणि तणाव

किशोरवयामध्ये हार्मोनमधील बदल आणि ताणतणावामुळे त्वचा जास्त प्रमाणात तेलकट होऊ शकते. यामुळे त्वचेची छिद्रे बंद होतात. मासिक पाळीदरम्यानही हार्मोनमध्ये बदल होत असतात. मुरुम येण्यामागील हे देखील एक मुख्य कारण असू शकते. पिंपल्स येणे ही नैसर्गिक बाब आहे. पण त्यामुळे चेहऱ्यावर केमिकलचा मारा करणं टाळा. साबणाऐवजी सौम्य स्वरुपातील फेसवॉश वापरावा. डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्वचेसाठी योग्य ते उपचार घ्या.

नियमित मेकअप करणे

तुम्हाला नियमित मेकअप करण्याची आवश्यकता असेल तर पर्याय नाही. पण रात्री झोपण्यापूर्वी मेकअप काढणं गरजेचं आहे. जेणेकरून त्वचेचा पोत खराब होणार नाही. सौंदर्यप्रसाधनं वापरतानाही ती तुमच्या त्वचेला साजेशी आहेत की नाहीत? हे तपासणं गरजेचं आहे. तुमच्या नेहमीच्या ब्युटिशियनकडून कोणती उत्पादनं त्वचेला सूट होतील याची माहिती जाणून घ्या. कारण त्यांना तुमच्या त्वचेचा पोत माहीत असतो. ब्युटी प्रोडक्टचा वापर करून पाहण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्वचेचं नुकसान होऊ शकते.

कपाळावर मुरुम येऊ नये, यासाठी उपाय

- चेहरा स्वच्छ धुणे आवश्यक आहे. आठवड्यातून दोन वेळा चेहऱ्यावर क्लींझर लावून त्वचा एक्सफोलिएट करा.
- केस तेलकट होण्यापूर्वीच शॅम्पूनं धुवावेत
- एखादे ब्युटी प्रोडक्ट वापरल्यानंतर चेहऱ्यावर जळजळ होत असल्यास ते प्रोडक्ट कधीच वापरू नये.
- रात्री कमीत कमी सात ते आठ तासांची झोप घ्या
- उन्हामध्ये फिरणं टाळा
- नियमित व्यायाम, योगासने करा
- उन्हातून आल्यावर चेहरा गार पाण्यानं धुवा.
- मद्यपान आणि धूम्रपान करू नका.
- पौष्टिक आहाराचे सेवन करा.

सावधान

तुम्हीही फेस वॉशनंतर टॉवेलचा वापर करता? त्वचेचं होतंय गंभीर नुकसान

तुम्ही देखील शरीर आणि चेहरा पुसण्यासाठी टॉवेलचा वापर करत असाल. इतकंच नाही तर फेस वॉश केल्यानंतरही पुन्हा याच टॉवेलचा वापर होत असेल. आता तुम्ही असा विचार करत असाल की यामध्ये नेमकी समस्या काय आहे? एकाच टॉवेलचा वारंवार वापर केल्यास तुमच्या त्वचेचं गंभीर नुकसान होऊ शकते. अस्वच्छ टॉवेलचा वापर केल्यास चेहऱ्यावर मुरुम येऊ शकतात. तसंच याच टॉवेलचा दिवसभरात सातत्यानं वापर केला तर त्वचेवरील नैसर्गिक तेल कमी होण्याची भीती असते. यामुळे त्वचा कोरडी होऊन निस्तेज दिसू लागते. त्वचेचं नुकसानच होत असल्यानं चेहरा पुसण्यासाठी तुम्ही टॉवेलचा वापर करणं थांबवल्यास उत्तम. जाणून घेऊया चेहरा पुसण्यासाठी टॉवेलचा उपयोग कसा करावा आणि यामुळे त्वचेवर कोणकोणते दुष्परिणाम होऊ शकतात.

मुरुमांची समस्या

काही जण नियमित स्वरुपात टॉवेल स्वच्छ धुवत नाहीत. ज्यामुळे टॉवेलवर मोठ्या प्रमाणात सूक्ष्म जीवजंतूंची पैदास होते. याच टॉवेलचा वापर तुम्ही चेहरा पुसण्यासाठी केल्यास त्वचेच्या कित्येक गंभीर समस्या उद्भवू शकतात. विशेषतः मुरुमांची समस्या. चेहरा धुतल्यानंतर पुसण्यासाठी टॉवेलऐवजी टिशू पेपरचा वापर करावा. टिशू पेपर देखील स्वच्छ आणि कोरड्या ठिकाणी ठेवावा. टिशू पेपरवर धूळ जमा झालेली असल्यास त्याचा वापर करू नये.

त्वचा होऊ लागते कोरडी

आपल्या चेहऱ्यावरील त्वचा अतिशय संवेदनशील असते. यामुळे अस्वच्छ टॉवेलचा वापर केल्यास त्वचेचं नुकसान होऊ शकते. टॉवेलच्या वापरामुळे त्वचेचा पोत बिघडतो. शिवाय, त्वचेवरील नैसर्गिक तेल देखील कमी होऊ लागते. ज्यामुळे त्वचा कोरडी आणि निस्तेज होते. ही समस्या टाळण्यासाठी तुम्ही कितीही प्रमाणात मॉईश्चराइझरचा वापर केला तरीही तुमची त्वचा कोरडीच राहते. त्वचा कोरडी होऊ नये, यासाठी जितके शक्य होईल तितके टॉवलचा उपयोग करणं टाळा.

कोणत्याही प्रोडक्टचा होत नाही परिणाम

तुमच्या चेहऱ्याची त्वचा मुळातच कोरडी आहे. यावर उपाय म्हणून तुम्ही कितीही महागडे क्रीम अथवा मॉईश्चराइझर वापरले तरीही त्यापासून कोणताच फायदा होणार नाही. कारण तुमची त्वचा क्रीम किंवा मॉईश्चराइझर योग्य पद्धतीनं शोषून घेत नाही. अशा परिस्थितीत त्वचा थोडीशी ओलसर वाटल्यास चेहऱ्यावर क्रीम किंवा लोशन लावा. ही समस्या टाळण्यासाठी टॉवेलनं चेहरा पुसण्याची चूक करू नका. चेहरा धुतल्यानंतर पाणी थोडा वेळ चेहऱ्यावर तसेच राहू द्या किंवा टिशू पेपरचा वापर करा.

सुरकुत्यांची समस्या

वृद्धत्वापूर्वीच आपल्या चेहऱ्यावर सुरकुत्या येऊ नये, यासाठी आतापासूनच टॉवेलचा वापर करणं थांबवा. आपल्या चेहऱ्याची त्वचा अतिशय नाजूक असते. यामुळे जाडसर किंवा खरखरीत टॉवेलचा वापर करू नये. वापर केल्यास चेहऱ्यावरील नैसर्गिक चमक, ओलावा नाहीसा होण्याची शक्यता आहे. चेहऱ्याची देखभाल योग्य पद्धतीनं व्हावी, यासाठी प्रत्येक गोष्ट सौम्य स्वरुपातीलच असेल याची काळजी घ्या.

नियमित स्वच्छ टॉवेलचा करा वापर

चेहरा पुसण्यासाठी नियमित स्वच्छ टॉवेलचा वापर केल्यास आपली त्वचा सूक्ष्म जीवजंतूंच्या संपर्कात येण्यापासून रोखली जाऊ शकते. चेहरा स्वच्छ धुताना त्वचा रगडण्याची चूक करू नका. यामुळे त्वचेचा पोत बिघडू शकतो. शिवाय, टॉवेलचा वापर करून झाल्यानंतर तो गरम पाण्यानं धुवा. कोमट किंवा थंड पाण्याच्या तुलनेत गरम पाण्याचा वापर केल्यास त्यावरील जीवजंतूचा खात्मा होतो. गंभीर त्वचेच्या समस्या टाळण्यासाठी या गोष्टी फॉलो करा.



नसरापूर अत्याचार प्रकरणी 3 चिमुकलाने कोर्टात दिली महत्त्वाची साक्ष

आम्ही फटीतून पाहिलं तर त्याने...



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पुण्यातील भोर नसरापूरमधील साडेतीन वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार आणि त्यानंतर तिची निघृण हत्या करण्यात आली. या घटनेनंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणात नराधमाला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणाची सुनावणी सुरु आहे. धक्कादायक म्हणजे घटनेच्या दिवशी नराधम गायीच्या गोठ्यात चिमुकलीवर अत्याचार करत असताना गावातील तीन लहान मुलांनी पत्र्याच्या शेडमधून पाहिलं होतं. नराधम सध्या येरवडा तुरुंगात आहे. व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे या तिघा मुलांसमोर नराधमाची ओळख परेड करण्यात आली. या तिघांनी नराधमाला ओळखलं आहे. तसंच या तिन्ही मुलांनी कोर्टात महत्त्वपूर्ण साक्ष दिली आहे. त्यामुळे नराधमावरील दोष निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाली. या मुलांच्या धाडसीपणामुळे त्या निष्पाप मुलीला न्याय मिळणार आहे.

या तीन चिमुकल्याने न्यायालयात सांगितलं की, घटनेच्या दिवशी ते तिघ गोठ्याच्या परिसरात खेळत होते. त्यावेळी त्यांनी गोठ्यात आवाज आला म्हणून पत्र्याच्या शेडमधून पाहिलं. त्यावेळी या मुलांना तिथून पळवून लावण्यासाठी नराधमाने त्या तिघांवर दगडफेक केली. या तिघांनी या घटनेबद्दल निर्भीडपणे न्यायालयात आपली साक्ष नोंदवली आहे. एवढंच नाहीतर या तिघांनी या नराधमाला ओखळलं आहे. यापूर्वी पुणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या तिघांनी ही घटना पाहिल्यावर ते त्या चिमुकलीच्या घरी गेले होते. तेव्हा त्यांनी आजीला विचारलं की काका कुठे आहे, त्यावेळी आजीने ते झोपले आहेत असं सांगितलं. त्यानंतर हे पोरं तिथून निघून गेले आणि खेळण्यात ते या घटनेबद्दल विसरून गेले.

दरम्यान या तीन मुलांच्या साक्षीसोबत आतापर्यंत या नसरापूर अत्याचार प्रकरणात एकूण 82 साक्षीदारांची यादी सरकारी वकिलाने न्यायालयात सादर केली आहे. महत्त्वाचे म्हणजे यातील 16 साक्षीदारांची साक्ष विशेष सरकारी वकीलने न्यायालयात सादर केली आहे.

पुण्यातील भोरमधील नसरापूरात ही संतापजनक घटना 1 मे रोजी घडली होती. 65 वर्षीय नराधमाने चिमुकलीला एकट्यात पडून तिला चॉकलेटच आमीष दाखवून गोठ्यात गाय दाखवतो म्हणून घेऊन गेला. तिथे गेल्यावर तिच्यावर अत्याचार करत तिची निघृण हत्या करण्यात आली. ती कोणाला दिसू नये म्हणून गोठ्यातील शेणामध्ये तिला लपवण्यात आलं होतं. या प्रकरणाच्या तपासात अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. या घटनेनंतर महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली आहे.

केवायसी न केलेल्या महिला लाडकी बहीण योजनेतून बाद : मुख्यमंत्री फडणवीस

■मुंबई। प्रतिनिधी,

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत केवायसी पूर्ण न केलेल्या महिलांना यापुढे लाभ दिला जाणार नाही. मात्र, निकष पूर्ण करत पात्र ठरलेल्या सुमारे १ कोटी ७० लाख महिलांना योजनेचा लाभ नियमितपणे मिळत राहील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली.

महाराष्ट्राप्रमाणे देशातील इतर कोणत्याही राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात महिलांना थेट आर्थिक मदत दिली जात नसून ही देशातील सर्वात मोठी महिला कल्याण योजना



असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले. लाडकी बहीण योजनेंतर्गत राज्यातील तब्बल ८० लाख महिलांना ई-केवायसी प्रक्रियेनंतर अपात्र करण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध होताच या योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली होती. या पार्श्वभूमीवर मंगळवारी पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी योजनेची वस्तुस्थिती सांगत गोंधळावर पडदा टाकला.

''योजना सुरू करताना महिलांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ लागणार असल्याने स्व-घोषणापत्राच्या आधारे अर्ज स्वीकारण्यात आले होते. केवायसी मोहीम राबवून विविध विभागांच्या डेटाबेसशी पडताळणी केली. केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांना यापुढे पैसे दिले जाणार नाहीत. मात्र, यापूर्वी त्यांना देण्यात आलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल केली जाणार नाही,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

पाच लाख सरकारी कर्मचारी लाभार्थी

आयकर विभाग, सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन पोर्टल, चारचाकी वाहन मालकीची माहिती, शिधापत्रिका आदी नोंदींची तुलना करण्यात आली. या प्रक्रियेत सुमारे पाच लाख सरकारी कर्मचारी लाभ घेत असल्याचे आढळले. याशिवाय तर १४ हजार पुरुष लाभार्थी ठरल्याचे समोर आले. तसेच जवळपास दहा लाख लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

मिरा -भाईंदर, वसई -विरार पोलीस आयुक्तालयात ९२१ नवे कर्मचारी

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस भरती प्रक्रिया अखेर यशस्वीरित्या पूर्ण झाली असून, आयुक्तालयात ९२१ नवे पोलीस कर्मचारी दाखल झाले आहेत. या नव्या भरतीमुळे गेल्या काही वर्षांपासून जाणवणारी मनुष्यबळाची कमतरता मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना होऊन जवळपास सहा वर्षे पूर्ण होत आली आहेत. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता येथील मनुष्यबळाचा तुटवडा भरून काढण्यासाठी आयुक्तालयाकडून दुसरी मोठी भरती प्रक्रिया हाती घेण्यात आली होती. २० फेब्रुवारीपासून या प्रक्रियेला सुरुवात झाली. या भरतीमध्ये एकूण ९२१ पदांसाठी तब्बल ५७,९९० अर्ज



प्राप्त झाले होते. यामध्ये विशेष बाब म्हणजे अर्जदारांमध्ये उच्चशिक्षित तरुण-तरुणींचा मोठ्या प्रमाणावर समावेश होता. ८४० पोलीस शिपाई पदासाठी ३९,२०९ अर्ज तर ८१ चालक पोलीस शिपाई पदासाठी १८,७८८ अर्ज असे एकूण ५७, ८०९ अर्ज आले होते.

मिरा-भाईंदर शहरात पार पडलेल्या या पोलीस भरतीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो तरुण-तरुणी आपले नशीब आजमावण्यासाठी आले होते. उमेदवारांची अत्यंत कडक अशी शारीरिक चाचणी भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर घेण्यात आली. रणरणत्या उन्हात आणि आव्हानात्मक परिस्थितीत उमेदवारांनी या चाचणी परीक्षा दिली होती. अखेर या संपूर्ण पारदर्शक भरती प्रक्रियेचा अंतिम निकाल जाहीर झाला असून, निवड झालेल्या ९२१ पात्र उमेदवारांची आयुक्तालयात नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झालेल्या या सर्व नवनियुक्त कर्मचाऱ्यांना पुढील आवश्यक प्रशिक्षणासाठी नागपूर किंवा अकोला येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर, या सर्व कर्मचाऱ्यांची आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाणे आणि विशेष विभागांमध्ये नियुक्ती करण्यात येईल, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

'माझा नवरा तृतीयपंथी...'

नवविवाहितेच्या सुखी संसाराच्या स्वप्नाचा शेवट

लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी आपल्याला आपला पती ट्रान्सजेंडर (तृतीयपंथी) असल्याचे समजले, असा खळबळजनक आरोप पीडितेने केला आहे. जेव्हा तिने या गोष्टीला विरोध केला, तेव्हा तिच्या पतीने तिला जीवे मारण्याची आणि तिचा मृतदेह माहेरी पाठवून देण्याची धमकी दिली. यानंतर सासरच्या मंडळींनी तिला सतत मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या छळण्यास सुरुवात केली. पीडितेने कशीबशी ही सर्व हकीकत आपल्या माहेरच्या लोकांना फोनवरून सांगितली.

■मुंबई। प्रतिनिधी,

लग्नाच्या नावाखाली कथित फसवणूक आणि छळाची एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका नवविवाहितेने तिच्या पतीसह सासरच्या 11 लोकांविरुद्ध फसवणूक, हुंड्यासाठी छळ, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत दिघवारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. बिहारच्या सारण जिल्ह्यातील ही घटना आहे.

थाटामाटात लग्न पण...

पीडितेने पोलिसांना दिलेल्या अर्जात म्हटले आहे की, 9 मार्च रोजी तिचा विवाह शितलपूर नावाच्या एका गावात झाला होता. या लग्नात तिच्या वडिलांनी भेट म्हणून सहा लाख रुपये रोख, सोन्या-चांदीचे दागिने, फर्निचर, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन आणि कपाटासह सुमारे तीन लाख रुपयांचे साहित्य दिले होते. लग्न थाटामाटात पार पडले तरी त्यानंतर पीडितेला जबरदस्त धक्का बसला.

कपड्यांसह साडेचार लाख रुपये

फसवणूक झाल्याचे समजताच जेव्हा पीडितेचे वडील आणि भाऊ तिला भेटण्यासाठी सासरच्या घरी पोहोचले, तेव्हा सासरच्या लोकांनी त्यांना शिवीगाळ करत लाठीकाठ्या आणि शस्त्रांच्या जोरावर बेदम मारहाण केली. तसेच पुन्हा आल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. पीडितेने या प्रकरणी पती संतोष कुमार महतो, सासरे मनोज महतो आणि सासू इंद्रवती देवी यांच्यासह एकूण 11 जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. 20 मार्च रोजी तिचे कपडे आणि साडेचार लाख रुपयांचे दागिने काढून घेऊन तिला घरातून हाकलून देण्यात आले. या संदर्भात दिघवारा पोलिसांनी तक्रार मिळाली असून, प्रकरणाचा तपास करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल असे सांगितले आहे.

उपचाराअभावी चिमुकलीचा मृत्यू... व्हेंटिलेटर आणि NICUसाठी वडिलांची धावपळ व्यर्थ

उल्हासनगरच्या आरोग्य व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

अत्यंत कमी वजनाच्या नवजात बालिकेला आवश्यक असलेली नवजात शिशु अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटर सुविधा वेळेत उपलब्ध न झाल्याने तिची जीवनाशी सुरू असलेली झुंज अखेर अपयशी ठरली. या हृदयद्रावक घटनेमुळे उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयातील आरोग्य सुविधांच्या मयार्दा पुन्हा एकदा समोर आल्या असून, एका निष्पाप जीवाच्या मृत्यूने आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

या प्रकरणी भाजपच्या नगरसेविका सुचित्रा सुधीर सिंग यांनी मंगळवारी शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. मनोहर बनसोडे यांची भेट घेऊन घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. मिळालेल्या माहितीनुसार, नाजीरा धिरेंद्र राजभर यांच्या नवजात कन्येचा जन्म अत्यंत कमी वजनासह झाला होता. जन्मानंतर तिची



प्रकृती चिंताजनक असल्याने तिला तातडीने नवजात शिशु अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटर सपोर्टची आवश्यकता होती. मात्र, उल्हासनगर-३ येथील मध्यवर्ती रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध नसल्याने बालिकेवर आवश्यक उपचार करता आले नाहीत.

मुलीचा जीव वाचवण्यासाठी तिच्या वडिलांनी कळवा, सायन, वाडिया तसेच मुंबई परिसरातील विविध शासकीय रुग्णालयांमध्ये व्हेंटिलेटर बेड मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध न झाल्याने अखेर त्या चिमुकलीचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर नगरसेविका सुचित्रा सिंग यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य विभाग, उल्हासनगर शासकीय मध्यवर्ती रुग्णालय प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून रुग्णालयात तातडीने नवजात शिशु अतिदक्षता विभाग सुरू करण्याची मागणी केली आहे.

शहापूर, कसारा, कर्जत, मुरबाड, बदलापूर आणि उल्हासनगर परिसरातील हजारो गर्भवती महिला आणि नवजात बालकांसाठी हे रुग्णालय महत्त्वाचे आधारकेंद्र असूनही येथे अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. एका चिमुकलीचा मृत्यू ही केवळ आकडेवारी नसून आरोग्य व्यवस्थेतील उणिवांची वेदनादायी जाणीव असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

''उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात नवजात शिशु अतिदक्षता विभाग आणि व्हेंटिलेटर सुविधा नसल्यामुळे एका निष्पाप चिमुकलीचा जीव गेला, ही अत्यंत वेदनादायी आणि गंभीर बाब आहे. भविष्यात कोणत्याही पालकांवर अशी वेळ येऊ नये, यासाठी तातडीने अत्याधुनिक ठक्कव विभाग सुरू करण्यात यावा.''

सुचित्रा सुधीर सिंग (भाजप नगरसेविका)

''मध्यवर्ती रुग्णालयात नवजात शिशु अतिदक्षता विभाग सुरू करण्यासाठी आम्ही वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा आणि पत्रव्यवहार करत आहोत. संबंधित घटनेची सखोल चौकशी करण्यात येईल. रुग्णांना अधिक दजेर्दार आणि अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सकारात्मक प्रयत्न करत आहे.''

डॉ. मनोहर बनसोडे (अधीक्षक, मध्यवर्ती रुग्णालय)

14 वर्षीय मुलावर 40 वर्षीय महिलेचा जीव जडला, इन्स्टा लाईकने बहरले प्रेम...

■मुंबई। प्रतिनिधी,



इन्स्टाग्रामवर एकमेकांच्या रिल्स लाईक करण्यापासून सुरू झालेला संवाद एका अशा वळणावर येऊन ठेपला, ज्याने पोलीस प्रशासनालाही काही काळासाठी बुचकळ्यात टाकले. 4 मुलांची आई असलेल्या 40 वर्षीय महिलेचा 14 वर्षीय किशोरवयीन मुलावर जीव जडला. महिलेने दावा केला की त्यांनी लग्न केले आहे, मात्र आता तो मुलगा तिच्यासोबत राहण्यास नकार देत आहे. या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ज्या मुलाशी महिलेने नाते जोडल्याचा दावा केला, तो मुलगा तिच्या स्वतःच्या मोठ्या मुलापेक्षाही पाच वर्षांनी लहान आहे. सोशल मीडियावरून सुरू झालेली ही मैत्री कालांतराने भावनिक नात्यात कशी बदलली आणि अखेर ती पोलीस ठाण्यापर्यंत कशी पोहोचली, याची चर्चा परिसरात सुरु झालीये.

संपर्क न ठेवण्याचे दोन्ही बाजूंनी केले मान्य

अखेर नौतनवा पोलीस ठाण्याचे प्रभारी बसंत सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, महिलेने सुरुवातीला तक्रार दिली होती, परंतु नंतर तिने कोणतीही कायदेशीर कारवाई नको असे कळवले. दोन्ही बाजूकडील लोकांना समजावून सांगितल्यानंतर, भविष्यात एकमेकांशी कोणताही संपर्क न ठेवण्याचे दोन्ही बाजूंनी मान्य केले आहे. यामुळे हा वाद सध्या सामोपचाराने मिटला आहे. सोशल मीडियावरील अनोळखी लोकांशी संवाद साधताना किती सावधगिरी बाळगावी, याचे हे एक विदारक उदाहरण ठरले आहे. ऑनलाइन ओळख आणि त्यातून निर्माण होणारे गुंतागुंतीचे नाते हे आता कुटुंबासाठी आणि समाजासाठी मोठे आव्हान ठरत आहे. पोलिसांनी पालकांना आणि नागरिकांना सोशल मीडियाच्या वापराबाबत सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. ही संपूर्ण घटना उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्ह्यातील नौतनवा परिसरात घडली आहे.

तणावानंतर अखेर सामोपचाराने मिटला वाद

महिला मुळची गोरखपूरची रहिवासी असून ती आपल्या चार मुलांसह वास्तव्यास आहे. इन्स्टाग्रामवर रिल्सच्या माध्यमातून संपर्क झाल्यानंतर त्यांच्यातील गप्पांचा ओघ वाढत गेला आणि त्याचे रूपांतर अजब अशा नात्यात झाले. ज्या मुलाचा उल्लेख या प्रकरणात केला जात आहे, तो आपल्या वडिलांसोबत चेन्नईमध्ये राहतो. महिलेचा आरोप होता की, त्या मुलाने तिच्याशी विवाह केला आहे, परंतु आता तो तिला सोडून देत आहे. महिलेने नौतनवा पोलीस ठाण्यात धाव घेऊन जेव्हा हा सर्व प्रकार कथन केला, तेव्हा पोलीस अधिकारीही चक्रावून गेले. प्रकरण अल्पवयीन मुलाशी संबंधित असल्याने पोलिसांनी अत्यंत सावधगिरीने दोन्ही बाजू समजून घेतल्या. मुलाने आणि त्याच्या कुटुंबीयांनी या आरोपांवर आपली भूमिका मांडली. प्रकरण वाढू नये आणि भविष्य खराब होऊ नये यासाठी पोलिसांसह स्थानिक नागरिकांनी आणि दोन्ही बाजूच्या कुटुंबीयांनी महिलेची समजूत काढली.

बहिणीसोबत मुलाचे प्रेमसंबंध

भावासह साथीदारांनी संपवलं, मृतदेह गटारात...

■मुंबई। प्रतिनिधी,

दिल्लीतून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तरुणाने आणि त्याच्या साथीदाराने अल्पवयीन मुलावर चार वेळा चाकूने हल्ला केला. संबंधित अल्पवयीन मुलाचे एका मुलीशी अनैतिक प्रेमसंबंध होते, याच प्रेमसंबंधातून मुलीच्या भावाने त्याची हत्या केली आणि मृतदेह गटारात फेकून दिला. या प्रकरणात आरोपी मनदीप उर्फ मोनू (वय 26) याला अटक करण्यात आली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, मोनू आणि त्याच्या साथीदाराने पीडित मुलाला टार्गेट केलं.

घडलेल्या घटनेनुसार, 18 मे रोजी दोन तरुणांनी बोलण्याच्या बहाण्याने संबंधित मुलाला बोलावले. नंतर त्याच्यावर चाकूने सपासप वार केले. मुलाची हत्या करून आरोपींनी मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तसेच गुन्हा लपवण्यासाठी मृतदेह गटारात फेकून दिला, नंतर घटनास्थळावरून पळून गेले.

19 मे रोजी परिसरातील एक गंभीर मुलगा जखमी झाल्याची माहिती समोर आली. पीसीआरकडून पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. जखमी मुलाला मंगलोरी येथील संजय गांधी मेमोरियल रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांना त्याच्या शरीरावर चाकूने वार केले. बेशुद्ध होण्यापूर्वी त्या अल्पवयीन मुलाने आपल्या हल्लेखोरांची नावे शिवम आणि मनदीप अशी सांगितली होती, नंतर गुन्हा दाखल करून प्रकरणाचा पुढील तपास करण्यात आला.

तरुणाच्या बहिणीच्या प्रेमसंबंधांना विरोध

गुन्हे शाखा पथकाने गुरुवारी नजफगड-नांगलोई रस्त्यावरील बक्करवाला वळणाजवळ मोनूला शोधून अटक करण्यात आली. पोलिसांनी सांगितलं की, चौकशीदरम्यान त्याने खुलासा करत माहिती दिली की, त्याचा चुलत भाऊ शिवम याचा पीडित व्यक्तीच्या त्याच्या बहिणीसोबत प्रेमसंबंधांना विरोध होता, याच रागातून त्याने त्या मुलाची हत्या केली.

पोलिसांनी सांगितलं की, उत्तम नगरचा रहिवासी असलेल्या मोनू यापूर्वी दोन सशस्त्र दरोड्यांच्या आणि मारहाणीच्या गुन्ह्यासह तीन गुन्हेगार प्रकरणांत सामील झाला होता. मागील गुन्ह्यांमधील शिक्षा भोगल्यानंतर सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्याची तुरुंगातून सुटका करण्यात आली होती. पोलिसांनी सांगितलं की, सहआरोपीला अटक करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

इयत्ता 9 वी असताना ओळख झाली, नराधमाने 3 वर्षात केलं भयंकर

मागील तीन वर्षांपासूनची ओळख, प्रेमाच्या जाळ्यात ओढलं

मिळालेल्या माहितीनुसार, या नराधम आरोपीची ओळख विवान खांडेकर (वय 20 वर्षे, रा. मानकापूर) अशी झाली आहे. विवान हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा तरुण असून, त्याच्यावर यापूर्वी देखील मारामारीचे अनेक गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. आरोपी आणि पीडित मुलगी एकमेकांना मागील तीन वर्षांपासून ओळखत होते. सुरुवातीला त्यांच्यात मैत्री झाली, परंतु त्यानंतर आरोपीने हळूहळू तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि तिच्याशी लग्न करण्याचे खोटे आश्वासन दिले. या विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने पीडित मुलीच्या घरीच तिच्यावर अनेक महिने शारीरिक अत्याचार केले.

■मुंबई। प्रतिनिधी,

नागपूर शहरातून एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका 20 वर्षीय युवकाने 17 वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीला लग्नाचे खोटे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. ही पीडित मुलगी इयत्ता 12 वीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी असून, काही दिवसांपूर्वी प्रकृती अचानक बिघडल्याने जेव्हा कुटुंबीयांनी तिला उपचारासाठी रुग्णालयात नेले. तेव्हा ती गरोदर असल्याचे निदान झाले. या धक्कादायक खुलासाने कुटुंबियांना मोठा धक्का बसला आणि संपूर्ण प्रकार उघडकीस आला. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, नराधम आरोपीला पोलिसांनी त्वरित अटक केली आहे.

मुलगी गरोदर राहिल्याने प्रकार उघडकीस

नराधम विवानने केवळ मुलीच्या घरीच नाही, तर गोरेवाडा येथील एका हॉटेलमध्ये नेऊनही तिला लग्नाचे आणि नोकरी लागल्यानंतर संसार करण्याचे स्वप्न दाखवले. तिथेही त्याने तिच्यावर बलात्कार केला आणि तिचे आयुष्य उद्ध्वस्त केले. मुलगी गरोदर राहिल्याचे समजताच तिची शारीरिक स्थिती खालावली, तेव्हा नातेवाईकांनी तिच्याकडे विचारणा केली असता संपूर्ण प्रकार चव्हाट्यावर आला. पीडित मुलीने दिलेल्या माहितीनंतर नातेवाईकांनी तातडीने पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या प्रकरणी मानकापूर पोलिसांनी तक्रार मिळताच तत्परतेने कारवाई करत विवान खांडेकर याला ताब्यात घेतले आहे.

आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता आणि पॉक्सो कायद्याच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलीवर झालेल्या या अमानुष अत्याचारामुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, तो गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असल्याने अधिक सखोल तपास पोलीस करत आहेत.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com